

वक्रतुंड महाकाय । सुर्यकोटी समप्रभः ।।
निर्विघ्नं कुरुमें देव । सर्व कार्येषु सर्वदा ।।



नमामि शारदां देवी विणापुस्तकधारिणीम् ।
विद्यारंभंम् करिष्यामी प्रसन्नास्तू च् साः सदा ।।



महायोगपीठे तटे भीमरथ्या
वरं पुंडरीकाय दातुं मुनीन्द्रैः ।
समागत्य तिष्ठंतमानंदकंदं
परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ।।

# काकड आरती

## मंगलाचरण पहिलें, अभंग - १०

१) रुप पाहतां लोचनी। सुख झालें हो साजणी।।१।।
तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधव बरवा।।धृ।।
बहुता सुकृताची जोडी। म्हणुनी विठ्ठलीं आवडी।।३।।
सर्वसुखांचे आगर। बापरखुमा -देवीवर ।।४।।

२) आरंभी आवडी आदरें आलें नाम ।
तेणें सकळ सिध्दी जगीं झाले पूर्णकाम।।१।।
रामकृष्ण गोविंद गोपाळा।
तूं माय माऊली जीविंचा जिव्हाळा।।२।।
तुझियोनि नामें सकळ संदेह फिटला।
बापरखुमादेविवरु श्रीविठ्ठला।।३।।

३) राहो आतां हेंचि ध्यान। डोळां मन लंपट।।१।।
कोंडकोंडुनि धरीन जीवें। देहभावे पूजीन।।२।।
होईल येणें कळसा आलें। स्थिरावलें अंतरी।।३।।
तुका म्हणे गोजिरिया। विठोबा पायां पडो द्या।।४।।

४) ऐंके वचन कमळापति। मज रंकाची विनंती।।१।।
कर जोडीतो कथेकाळीं। आपण असावें जवळी।।धृ।।
घेई ऐसी भाक। मागेन जरी कांही एक।।३।।
तुकायाबंधु म्हणे देवा। शब्द इतुकाचि राखावा।।४।।

५) तुज पाहतां सामोरी। दृष्टि न फिरे माघारी ।।१।।
माझ्या चित्ता तुझ्या पायां। मिठी पडली पंढरीराया।।धृ।।
नव्हे सारितां निराळें। लवण मेळवितां जळें।।३।।
तुका म्हणे बळी। जीव दिला पायातळीं।।४।।

६) तुम्ही सनकादिक संत। म्हणविता कृपावंत।।१।।
एवढा करा उपकार । देवा सांगा नमस्कार ।।धृ।।
भाकावी करुणा। विनया वैकुंठींचा राणा।।३।।
तुका म्हणे मज आठवा। मूळ लवकरी पाठवा।। ४।।

७) आतां तुम्ही कृपावंत । साधु संत जिवलग ।।१।।
गोमटें तें करा माझे । भार ओझें तुम्हांसी ।। धृ ।।
वंचिले ते पायापाशीं । नाहीं यासी वेगळे ।।३ ।।
तुका म्हणे सोडिल्यां गांठी । दिली मिठी पायांसी ।। ४ ।।

८) लेंकुरांचे हित । वाहे माऊलीचें चित्त ।।१ ।।
ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीति ।।धृ ।।
पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ।।३।।
तुका म्हणे माझे । तुम्हां संतावरी ओझे ।।४।।

९) करुनी उचित । प्रेम घालीं हृदयांत ।।१।।
आलों दान मागायास । थोर करुनियां आस ।।धृ।।
चिंतनसमयी । सेवा आपुलीच देई ।।३।।
तुकया बंधु म्हणे भावा । मज निरवावें ठेवा ।।४।।

१०) न करीं उदास । माझी पुरवावी आस ।।१।।
ऐका नारायणा माझी। परीसा विज्ञापना ।।धृ।।
मायबाप बंधुजन। तुंचि सोयरा सज्जन ।।३।।
तुका म्हणे तुजविरहित। कोण करील माझे हित ।।४।।

११) गरुडाचे पायीं । ठेवी वेळोवेळां डोई ।।१।।
वेंगी आणावा तो हरि । मज दीनातें उद्धरीं ।।धृ।।
पाय लक्ष्मीच्या हाती। म्हणोनि येतों काकुलती ।।३।।
तुका म्हणे शेषा। जागें करा हृषीकेशा ।।४।।

१२) येग येग विठाबाई। माझे पंढरीचे आई ।।१।।
भीमा आणि चंद्रभागा। तुझे चरणींची गंगा ।।धृ।।
इतुक्यासहित त्वां बा यावें। माझे रंगणीं नाचावें ।।३।।

।। भजन - रामकृष्णहरि जय जय रामकृष्णहरि ।।

# मंगलाचरण दुसरें. अभंग ५

१)  उंचनीच कांही नेणे भगवंत।
तिष्ठे भावभक्त देखोनिया ।।धृ।।
दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी।
दैत्याघरी रक्षी प्रल्हादासी ।।२।।
चर्म रंगू लागेरोहीदासासंगे।
कबिराचे मागें शेले विणी ।।३।।
सजन कसाया विकूं  लागे मांस।
माळया सांवत्यास खुरपूं लागे ।।४।।
नरहरि सोनारा घडूं फुंकूं लागे।
चोखामेळ्यासंगे ढोरें ओढी ।।५।।
नामयाची जनी सवें वेंची सेणी।
धर्माघरीं पाणी वाहे झाडी ।।६।।
नाम्यासवें जेवी नव्हे संकोचित।
ज्ञानियाची भिंत अंगें ओढी ।।७।।
अर्जुनाचे रथीं होय हा सारथी।
भक्षी प्रिती पोहे सुदाम्याचे ।।८।।
गौळियांचे घरी अंगे गाई वळी।
द्वारपाळ बळीद्वारीं झाला ।।९।।
येकोबाचें ऋण फेडी हृषीकेशी।
अंबऋषीचे सोशी गर्भवास ।।१०।।
मिराबाईसाठीं घेतो विष प्याला।
दामाजीचा झाला पडिवार ।।११।।
घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची।
हुंडी त्या मेहत्याची अंगें भरी।।१२।।
पुंडलिकासाठी अझूनि तिष्ठत ।
तुका म्हणे मात धन्य त्याची ।।१३।।

२) श्रवणें कीर्तने झाले ते पावन।
सनकादिक जाण परम भक्त ।।१।।
झाली ते विश्रांति याचका सकळां।
जीवीं जीवनकळा श्रीमूर्तिराया ।।धृ।।
पादसेवनें अक्रुर झाला ब्रम्हरुप ।
प्रत्यक्ष स्वरुप गोविंदाचे ।।३।।
सख्यपणे अर्जुन नरनारायण ।
सृष्टि जनार्दन एकरुप ।।४।।
दास्यत्व निकट हनुमंते केले।
म्हणोनी देखिले रामचरण ।।५।।
बळी आणि भीष्म प्रल्हाद नारद ।
बिभीषणा वरच चंद्रार्क ।।६।।
व्यास आणि वसिष्ठ वाल्मिकादिक ।
अणिक पुंडलिकादि शिरोमणी ।।७।।
शुकादिका योगी रंगले श्रीरंगी ।
परिक्षितीच्या अंगी ठसविले ।।८।।
उद्धव यादव आणि ते गोपाळ ।
गोपिकांचे मेळ ब्रम्हरुप ।।९।।
अनंत भक्ता राशी तरले ते वानर।
ज्ञानदेवा घर चिदानंदी ।।१०।।

३) पवित्र तें कुळ पावन तो देश।
जेथें हरीचे दास जन्म घेती ।।१।।
कर्मधर्म त्यांचा झाला नारायण।
त्यांचेनि पावन तिन्ही लोक ।।धृ।।
वर्णअभिमानानें कोण झाले पावन ।
ऐसे द्या सांगून मजपाशीं।।३।।
अंत्यजादि योनी तरल्या हरिभजनाने ।
तयांची पुराणें भाट झालीं ।।४।।
वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार।
धागा हा चांभार रोहिदास ।।५।।
कबीर मोमीन लतिफा मुसलमान।
सेना न्हावी जाण विष्णुदास ।।६।।
कान्होपात्रा खोदु पिंजारी तो दादु।
भजनी अभेदु हरी पायीं।।७।।
चोखामेळा बंका जातीचे महार।
त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी।।८।।
नामयाची जनी कोण तिचा भाव।
जेवी पंढरीराव तियेसवें ।।९।।
मैराळ जनक कोण कुळ त्यांचे।
महिमान तयाचें काय सांगो।।१०।।
यातायातीधर्म नाहीं विष्णुदास।
निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं।।११।।
तुका म्हणे तुम्हीं विचारावे ग्रंथ।
तारीले पतित नेणों किती।।१२

४) बहु उतावीळ भक्तीचिया काजा।
होशी केशीराजा मायबापा।।१।।
तुझ्या पायीं मज झालासे विश्वास।
म्हणोनियां आसा मोकलिली।।धृ।।
ऋषि मुनि सिध्द साधक अपार।
कळला विचार त्यांसी तुझा ।।२।।
नाहीं नाश तें सुथ दिलें तयांस।
झाले जे उदास सर्वभावें।।४।।
तुका म्हणे सुख न माय मानसीं।
धरिले जींवेंसी पाय तुझे।।५।।

५) पुण्यवंत व्हावें। घेता सज्जनांची नांवे।।१।।
नेघे माढी वाचा तुटी। महालाभ फुकासाठी ।।धृ।।
विश्रांतीचा ठाव। पायीं संतांचिया भाव।।३।।
तुका म्हणे पापें। जाती संतांचिया जपें।।४।।

।।भजन- ज्ञानोबा तुकाराम।।

# मंगलाचरण तिसरें, अभंग ७

१) सुंदर तें ध्यान उभे विटेवरी।
कर कटावरी ठेवूनियां।।१।।
तुळसीहार गळां कांसे पीतांबर।
आवडे निरंतर हेचि ध्यान।।धृ।।
मकरकुंडलें तळपती श्रवणी।
कंठीं कौस्तुभमणि विराजित ।।३।।
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख।
पाहीन श्रीमुख आवडीनें।।४।।

२) राजस सुकुमार मदनाचा पुतळा।
रविशशिकळा  लोपालिया।।१।।
कस्तुरी मळवट चंदनाची उटी।
रुळे माळ कंठी वैजयंती।।२।।
मुकुट कुंडलें श्रीमुख शोभलें।
सुखाचे ओतले सकळही।।३।।
कासे सोनसळा पांघरे पाटोळा।
घननीळ सांवळा बाइयांनो ।।४।।
सकळही तुम्ही व्हागे एकीसवा।
तुका म्हणे जीवा धीर नाहीं।।५।।

३)सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती।
रखुमाईच्या पती सोयरिया ।।१।।
गोड तुझें रुप गोड तुझें नाम।
देईं मज प्रेम सर्वकाळ।।धृ।।
विठो माउलीये हाचि वर देई।
संचरोनि राहीं हृदयमाजीं।।३।।
तुका म्हणे कांहीं न मागें आणिक।
तुझे पायीं सुख सर्व आहे।।४।।

४) आवडे हें रुप गोजिरें सगुण।
पाहतां लोचन सुखावले।।१।।
आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहे।
जो मी तुज पाहें पांडुरंगा।।धृ।।
लांचावलें मन लागलीसे गोडि।
तें जीवें न सोडी ऐसें झालें।।३।।
तुका म्हणे आम्ही मागावी लडिवाली।
पुरवावी आळी मायबांपे।।४।।

५) झणीं दृष्टी लागो तुझ्या सगुणपणा।
जेणें माझ्या मना बोध केला।।१।।
अनंता जन्मींचे विचारलों दुःख।
पाहतां तुझें मुख पांडूरंगा।।धृ।।
योगियांच्या ध्यानी ध्यातां नातुडसी।
तो तूं आम्हापाशी मागें पुढे।।३।।
नामा म्हणे जीवें करीन निंबलोण।
विटेसहीत चरण ओंवाळीन।।४।।

६) पाहतां श्रीमुख सुखावलें सुख।
डोळियांची भूक न वजे माझ्या।।१।।
जिव्हे गोड तीन अक्षरांचा रस।
अमृतं जयास फिकें पुढे।।धृ।।
श्रवणाची वाट चोखाळली शुध्द।
गेले भेदाभेद निवारोनी।।३।।
महामळें मन होतें जें गादलें।
शुध्द चोखाळलें स्फटिक जैसें।।४।।
तुका म्हणे माझ्या जीवचें जीवन।
विठ्ठल निधान सांपडलें।।५।।

७) येणे मुखें तुझें वर्णी गुण नाम।
तेंचि मज प्रेम देईं देवा।।१।।
डोळे भरोनियां पाहिन तुझें मुख।
तेंचि मज सुख देईं देवा।।धृ।।
कान भरोनियां ऐकेन तुझी कीर्ति।
ते मज विश्रांती देईं देवा।।३।।
वाहे रंगी टाळी नाचेन उदास।
हें देईं हातांस पायां सुख ।।४।।
तुका म्हणे माझा सकळ देहभाव।
आणिक नको ठाव चिंतूं यासी।।५।।

८) नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितीभाव।
मी भक्त तूं देव ऐसें करी।।१।।
दावीं रुप मज गोपिकारमणा।
ठेवीन चरणांवरी माथा ।।धृ।।
पाहोनि श्रीमुख देईन आलिंगन।
जीवें निंबलोण उतरीन।।३।।
पुसतां सांगेन हितगुज मात।
बैसोनि एकांत सुखगोष्टी।।४।।
तुका म्हणे यासी न लावीं उसीर।
माझें अभ्यंतर जाणोनियां।।५।।

।।भजन-जय जय विठोबा रखुमाई।।

# काकड आरती, अभंग १४

१) वृंदावनी आनंदु रे । विठ्ठल देवो आळविती रे।।धृ।।
गोपाळ रतले रे। विठ्ठल देवो आळविती रे।।२।।
निवृत्तीदासा प्रियो रे। विठ्ठल देवो आळविती रे।।३।।

१) उठा उठा प्रभात जाहली। चिंता श्रीविठ्ठल माऊली।
दीनजनांची साऊली। येई धाउनी स्मरतांचि।।१।।
पंढरपुरीं जे भीमातटी। सुंदर मनोहर गोमटी।
दोन्ही कर ठेवोनि कटीं। भेटीसाठीं तिष्ठतसे।।धृ।।
किरीच कुंडलें मंडित। श्रीमुख अति सुंदर शोभत।
गंळा वैजयंती डुल्लत। हार मिरवत तुळशीचा।।३।।
सुरेख मूर्ति सगुण सांवळी। कंठीं कौस्तुभ एकावळी।
केशर उटी परिमळ आगळी। बुक्का भाळीं विलसतसे ।।४।।
पीत पीतांबर कसली कटीं। अक्षयी वीट चरण तळवटीं।
सकळ सौंदर्य सुखाची पेटी। हृदयसंपुष्टी आठवा ते।।५।।
अति प्रिय आवडे तुळसी बुक्का। तैसीच प्रीति करी भोळ्या भाविकां।
नामा पदपंकजपादुका। शिरीं मस्तकीं वंदितसे।।६।।

२) उठा जागे व्हा रे आतां। स्मरण करा पंढरीनाथा।
भावें चरणीं ठेवा माथा। चुकवा व्यथा जन्माच्या।।१।।
धन दारा पुत्र। बंधु सोयरे पिशून।
सर्व मिथ्था हें जाणून। शरण रिघा देवासी ।।धृ।।
माया विघ्नें भ्रमला खरें। म्हणतां मी माझेनि घरें।
हें तों संपत्तीचें वारें। साचोकारें जाईल।।३।।
आयुष्य जात आहे पाहा। काळ जपतसे महा।
स्वहिताचा घोर वहा। ध्यांना रहा श्रीहरिच्या।।४।।
संतचरणीं भाव धरा। क्षणक्षणा नाम स्मरा।
मुक्ति सायुज्याता वरा। हेंचि करा बापांनो।।५।।
विष्णूदास विनवी नामा। भुलूं नका भवकामा।
धरा अंतरीं निजप्रेमा। न चुका नेमा हरिभक्ती।।६।।

३) उठा उठा साधुसंता। साधा आपुलें हित।
जाईल हा नरदेह। मग कैचा भगवंत।।धृ।।
उठोनि वेगेंसी। चला जाऊं राउळासी।
जळती पातकांच्या राशी। काकड आरती देखिलियां।।२।।
उठोनियां पहाटे। विठ्ठल पहा उभा विटें।
चरण तयाचे गोमटे। अमृत दृष्टी अवलोका।।३।।
जागें करा रुक्मिणीवरा। देव आहे निदसुरा।
वेगें निंबलोण करा। दृष्ट होईल तयासी।।४।।
पुढें वाजंत्री वाजती। ढोल दमामे गर्जती।
होते काकड आरती। पांडुरंग रायाची।।५।।
सिंहनाद शंख भेरी। गजर होतो महाव्दारीं।
केशवराज विटेवरीं। नामा चरण वंदितो।।६।।

४) उठा पांडूरंगा आतां दर्शन द्या सकळां।
झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा।।१।।
संत साधु मुनी अवघे झालेती गोळा।
सोडा शेजसुख आतां पाहूं द्या मुखकमळा।।धृ।।
रंगमंडपीं महाव्दारीं झालीसे दाटी।
मन उतावीळ रुप पाहावया दृष्टी ।।३।।
राही रखुमाई तुम्हां येऊ द्या दया।
शेजे हालउनी जागें करा देवराया।।४।।
गरुड हनुमंत पुढें पाहाती वाट।
स्वर्गींचे सुरवर घेऊनि आले बोभाट ।।५।।
झालें मुक्तव्दार लाभ झाला रोकडा।
विष्णुदास नामा उभा घेवूनि काकडा।।६।।

५)उठा अरुणोदय प्रकाश जहाला। घंटा गजर गर्जिन्नला।
हरि चौघडा सुरु झाला। काकड आरती समयाचा।।१।।
महाव्दारीं वैष्णवजन। पूजासामुग्री घेऊन।
आले द्यावें तयासी दर्शन। बंदिजन गर्जती।।धृ।।
सभामंडपीं कीर्तन घोष। मृदंग टाळ विणे सुरस।
आनंदे गाती हरीचे दास। परम उल्हासें करुनियां।।३।।
चंद्रभागें वालवंटी। प्रातःस्नाना जनदाटी।
आतां येतील आपुले भेटी। उठीं उठीं गोविंदा ।।४।।
ऐसें विनवी रुक्मिणी। जागृत झाले चक्रपाणि।
नामा बध्दांजुळी जोडोनी। चरणीं माथा ठेवितसे।।५।।

६) उठा पांडूरंगा प्रभात समयो पातला।
वैष्णवांचा मा गरुडपारी दाटला।।१।।
वाळवंटापासूनि महाव्दारापर्यंत।
सुरवरांची मांदी उभे जोडोनि हात ।।धृ।।
शुकसनकादिक नारद तुंबर भक्तांच्या कोटी।
कवाडा आडूनि पाहताती जगजेठी ।।३।।
सुरवरांची  विमानें गगनी दाटलीं सकळ।
रखुमाई माते वेगीं घननीळ।।४।।
त्रिशूळ डमरु घेऊनि आला गिरजेचा कांत।।५।।
पंचप्राण आरत्या घेऊनियां देवस्त्रियां येती।
भावें ओवाळितीा राही रखुमाईचा पती।।६।।
अनंत अवतार घेसी भक्तांकारणें।
कनवाळू कृपाळू दीनालागीं उध्दरणें।।७।।
चौं युगांचा भक्त नामा उभा कीर्तनीं।
पाठीमागें डोळे लाऊनि उभी ते जनी।।८।।

८) अवघे हरिजन मिळोनी आलो राउळा।
दोन्ही कर जोडोनि विनविती गोपाळा ।।१।।
उठा पांडूरंगा हरिजना सांभाळी।
पाहुं द्या वदन वंदू पायांची धूळी ।।२।।
उगवला दिनकर झाल्या निवळस दिशा।
कोठवरी निद्रा आतां उठा परेशा ।।३।।
तुका म्हणे आम्ही उभे तिष्ठत व्दारासी।
दोन्ही कर जोडोनि गाई गोपाळ सेवेसी।।४।।

९) कां हो तुम्ही निश्चिंतीनें निजलाती हरी।
मानिलें हें सुख आम्ही वाचुं कैशापरी ।।१।।
उठा सावध व्हावे क्षेम सकळां द्यावे।
जया जी वासना तयां तैसे पुरवावें ।।२।।
जन्मोजन्मीं सांभाळिलें क्षमा करा अन्याय।
कृपा करी देवा आम्हां तूचिं बापमाय।।३।।
तुका म्हणे करा वडीलपण दानासी।
जणें सुख होय सकळ हे जनासी।।४।।

७) उठा सकळजन उठिले नारायण।
आनंदले मुनिजन तिन्ही लोक।।१।।
करा जयजयकार वाद्यांचे गजर।
मृदंग अपार टाळघोळ।।धृ।।
जोडोनियां कर मुखा पाहा सादर।
पायावरीं शिर ठेवूनियां।।३।।
तुका म्हणे काय पंढियें तें तें मागा।
आपुलालें सांगा सुखदुःख।।४।।

# काकडा ओंवाळणे

१५) भक्तीचिया पोटीं बोध काकड ज्योती।
पंचप्राण जीवें भावे ओवाळू आरती।।१।।
ओवांळू आरती माझ्या पंढरीनाथा।
दोन्ही कर जोडोनि चरणीं ठेवीन माथा ।।२।।
काय महिमा वर्णू आतां सांगणे किती।
कोटी ब्रह्महत्या मुख पाहतां जाती।।३।।
राही रखुमाई दोही दो बाहीं।
तुका म्हणे दीप घेऊनी उन्मन ती शोभा।
विटेवरी उभा दिसे लावण्यगाभा।।५।।

१०) कनकाच्या परियेळीं उजळुनी आरती।
रत्नदीपप्रभा केशा पाजळल्या ज्योती ।।१।।
ओवाळूं गे माये सबाह्य साजिरा ।
राही रखुमाबाई सत्यभामेच्या वरा।।धृ।।
मंडित चतुर्भुज दिव्य कानीं कुंडलें।
श्रीमुखीची शोभा पाहतां तेज फांकलें।।३।।
वैजयंती माळ गळां शोभे श्रीमंत।
शंखचक्रगदापद्म आयुधें शोभत।।४।।
सांवळा सकुमार जैसा कर्दळी गाभा।
चरणींची नेंपुरें वांकी गर्जती नभा।।५।।
ओवाळीतां मन हें उभें ठाकलें ठायीं।
समदृष्टी समान तुकया  लागला पायीं।।६।।

१२) तपे तीर्थे व्रतें जया पायीं मिरवती।
संत मुनीवृंदे जया सुखासी लाधती।।१।।
हरीच्या पायालागी आरती करु।
कायावाचामनें चरण दृढं धरुं।।धृ।।
सुरासुर उबे नमना कर जोडोनि।
प्रल्हाद नारद अखंड जयाचे ध्यानी।।३।।
एकाएकी विनटला जनार्दन पायी।

१२) संतसनकादिक भक्त मिळसे आणीक।
स्वानंदे गर्जती पाहूं आले कौतुक।।१।।
नवल होते आरती देवाधिदेवा।
स्वर्गींहुनी सुरवर पाहूं येती केशवा ।।धृ।।
नरनारीबाळां टक पडियलें नयनां।
ओंवाळितां श्रीमुख धणी न पुरे मना।।३।।
एका जनार्दनी मंगळ आरत्या गाती।
मिळाले वैष्णव जयजयकारें गर्जती।।४।।

१३) सहस्त्र दीपें दीप कैसी प्रकाशली प्रभा।
उजळल्या दशदिशा गगना आलीसे शोभा।।१।।
काकड आरती माझ्या कृष्णा सभागिया।
चराचर मोहरलें तुझी मुर्ती पहावया।।धृ।।
कोंदलेसे तेज प्रभा झालीसे एक।
नित्य नवा आनंद ओविळितां श्रीमुख।।३।।
आरती करितां तेज प्रकाशलें नयनीं।
तेणे तेजें मिनला एकाएकी जनार्दनी।।४।।

१४) लाजले गे माये आतां कोणा ओवाळूं।
जिकडे पाहावें तिकडें चतुर्भुज गोपाळ।।धृ।।
ओवाळूं मी गेलें माय गेलें व्दारकें।
जिकडे पाहावें तिकडें चतुर्भुज सारिखें।।२।।
ओवाळूं मी गेलें माय सखिया माझारीं।
जिकडे पाहावें तिकडें चतुर्भुज नरहरी ।।३।।
ओवाळूं मी गेलें माय शारंगधरा।
जिकडे पाहावें तिकडें चतुर्भुज परिवारा।।४।।
वैजयंती माळ गंळा श्रीवत्सलांछन।
विष्णूदास नामा येणें दाविली खुण।।५।।

१६) अवतारची राशी तो हा उभा विटेवरी।
शंखचक्र गदापद्मसहित करीं।।१।।
देखिला देखिला देवा आदि देव बरवा।
समाधान जीवा पाहतां वाटेंगे माये ।।धृ।।
सगुण चतुर्भुज रुपडें तेज पुंजाळतीं।
वंदोनि चरणरज नामा विनवीतसें पुढतीं।।३।।

१७) तुझिये निढळीं कोटि चंद्र प्रकाशे।
कमलनयन हास्यवदन हांसे।।१।।
हाल कां रे कृष्णा डोल कां रे।
घडिये घडिये घडिये गुज बोज कां रे ।।धृ।।
उबा राहोनिया कैसा हालवितो बाहो।
बापरखुमादेवीवरु विठ्ठल नाहो।।३।।

।।भजन-विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ।।

# भूपाळ्याचे अभंग (१२)

१) योगिया दुर्लभ तो म्यां देखिला साजणी।
पाहतां पाहतां मना न पुरे धणी।।१।।
देखिला देखिला माये देवांचा देवो।
फिटला संदेहो निमालें दुजेंपण।।धृ।।
अनंतरुपें अनंत वेषें देखिलें म्यां त्यासी।
बापरखुमादेवीवरु खूण बाणली कैसी।।३।।

२) करुनी विनवणी पायीं ठेवितों माथा।
परिसावी विनंती माझी पंढरीनाथा।।१।।
अखंडित असावेंसे वाटतें पायीं।
साहोनि संकोच ठाव थोडासा देईं।।धृ।।
असो नसो भाव आलों तुझीया ठाया।
कृपादृष्टी पाहें मजकडें पंढरीराया ।।३।।
तुका म्हणे तुझीं आम्हीं वेडीं वाकुडीं।
नामें भवपाश हातें आपलुल्या तोडीं।।४।।

३) माझें चित्त तुझे पायीं। राहे ऐसें करीं काहीं।
धरोनियां बाहीं। भव हा तारीं दातारा।।१।।
चतुरा तूं शिरोमणि। गुण लावण्याची खाणी।
मुगुट सकळां मणि। धन्या तूंचि विठोबा।।धृ।।
करीं तिमिरांचा नाश। उदयो होउनि प्रकाश।
तोडीं आशापाश। करीं वास हृदयी।।३।।
पाहें गुंतलों नेणतां। माझी असो तुम्हां चिंता।
तुका ठेवी माथा। पायीं आतां राखावें।।४।।

४) ऐसी वाट पाहें कांहीं निरोप कां मूळ।
कां हो कळवळा तुम्हां उमटेचि ना।।१।।
अहो पांडूरंगे पंढरीचे निवासे।
लावूनियां आसे चाळवूनि ठेविलें।।धृ।।
काय जन्मा येऊनियां केली म्यां जोडी।
ऐसें घडोघडी चित्ता येतें आठवूं ।।३।।
तुका म्हणे खरा न पवेचि विभाग।।
धिक्कारितों जग हेंचि लाहें हिसोबे।।४।।

५) बोलोनियां दाऊं कां तुम्ही नेणा जी देवा।
ठेवाल तें ठेवा ठायीं तैसा राहेन ।।१।।
पांगुळलें मन कांहीं नाठवे उपाय।
म्हणवूनी पाय जीवीं धरुनि राहिलो।।धृ।।
त्यांगें भोगे दुःख काय सांडावें मांडावें।
ऐसी धरियेली जीवें माझ्या थोर आशंका।।३।।
तुका म्हणे माते बाळ चुकलिया वनीं।
न पवतां जननी दुःख पावे विठ्ठले ।।४।।

६) कां गा केविंलवाणा केलों दीनाचा दीन।
काय तुझी हीन शक्ति झालीसे दिसे।।१।।
लाज येते मना तुझा म्हणवितां दास।
गोडी नाहीं रस बोलिलीया सारिखी।।धृ।।
लाजविलीं मागें संतांची हीं उत्तरे।
कळों येतें खरें दुजें एकावरुनि ।।३।।
तुका म्हणे माझी कोणी वदविली वाणी।
प्रसादा वांचूनी तुमचिया विठ्ठल।।४।।

७) जळो माझें कर्म वायां केली कटकट।
झालें तैसे तंट नाहीं आलें अनुभवा ।।१।।
आतां पुढें धीर काय देऊं या मना।
ऐसें नारायणा प्रेरिलें ते पाहिजे ।।धृ।।
गुणवंत केलों दोष जाणायासाठीं।
माझें माझें पोटीं बळकट दूषण।।३।।
तुका म्हणे अहो केशीराजा दयाळा।
बरवा हा लळा पाळीयेला शेवटीं।।४।।

८) जळोत तीं येथें उपजविती अंतराय।
सायासाची जोडी माझी तुमचें पाय।।१।।
आतां मज साह्य येथें करावें देवा।
तुझी घेईं सेवा सकळ गोवा उगवूनी।।धृ।।
भोगें रोगा जोडोनियां दिलें आणिका।
अरुचि ते हो कां आतां सकळांपासूनी।।३।।
तुका म्हणे असो तुझें तुझें मस्तकीं।
नाहीं ये लौकिकीं आतां मज वर्तणें।।४।।

९) न सांगतां तुम्हां कळों येतें अंतर।
विश्वीं विश्वंभर परिहारचि नलगे।।१।।
परि हें अनावर आवरितां आवडी।
अवसान ते घडी पुरों एकी देत नाहीं।।धृ।।
काय उमें मज येथें ठेविविले ठायीं।
पोटा आलों तईपासूनियां समर्थे।।३।।
तुका म्हणे अवघी आवरिली वासना।
आतां नारायणा दुसरियांपासूनी।।४।।

१०) तुजसवें आम्हीं अनुसरलों अबळा।
नको अंगी कळा राहो हरी हीन देऊ ।।१।।
सासुरवासा भितो जीव ओढे तुजपाशीं।
आतां दोहींविशी लज्जा राखें आमुची।।धृ।।
न कळंता संग झाला सहज खेळतां।
प्रवर्तली चिंता मागिलाचि यावरी।।३।।
तुका म्हणे असतां जैसें तेसें बरवें।
वचन या भावें वेंचुनिया विनटलों।।४।।

११) कामें नेलें चित्त नेदी अवलोकूं मुख।
बहु वाटें दुःख फुटों पाहे हृदय।।१।।
कां गा सासुरवासी मज केलें भगवंता।
आपुलिया सत्ता स्वाधीनता ते नाहीं।।धृ।।
प्रभातेसी वाटें तुमच्या यावें दर्शना।
येथें न चले थोरी उरली राहे वासना।।३।।
येथें अवघे वायां गेले दिसती सायास।
तुका म्हणे नास दिसे झाल्या वेंचाचा।।४।।

१२) आतां कोठें धावें मन। तुझे चरणा देखिलिया ।।१।।
भाग गेला शीण गेला। अवघा झाला आनंदु।।धृ।।
प्रेमरसें बैसली मिठी। आवडी लाठी मुखासी।।३।।
तुका म्हणें आम्हां जोगें। विठ्ठल घोगें खरें माप।।४।।

।। भजन-जय जय विठोबा रखुमाई।।

# मालिका ६ वी, अभंग १५ (पुजेची ओळ)

१) ज्ञानियांचा गुरु महाराज।
म्हणती ज्ञानदेव तुम्हां ऐसें।।१।।
मज पामरा हें काय थोरपण।
पायींची वाहाण पायीं बरी।।धृ।।
ब्रह्मादिक जेथें तुम्हां वोळगणें ।
ईतर तुळणें काया पुढें।।३।।
तुका म्हणे नेणें युक्तीची ते खोली।
म्हणोनि ठेविली पायीं डोई।।४।।

२) जयचिये व्दारी सोन्याचा पिंपळ।
अंगीं ऐसें बळ रेडा बोले।।१।।
करील तें काय नव्हे महाराज।
परि पाहें बीज शुध्द अंगी।।धृ।।
जयानें घातली मुक्तीची गवादी।
मेळविली मांदी वैष्णवांची।।३।।
तुका म्हणे तेथें सुखा काय उणें।
राहें समाधानें चित्ताचिया।।४।।

३) श्री पंढरीशा पतित भावना।
एक विज्ञापना पायांपाशीं।।१।।
अनाथ  जीवांचा तूं काज कैवारी।
ऐसी चराचरी ब्रीदावळी।।धृ।।
न सांगतां कळे अंतरींचे गुज।
आतां तुझी लाझ तुज देवां।।३।।
आळिकर त्याचें करिसी समाधान।
अभयाचें दान देऊनियां।।४।।
तुका म्हणे तूंची खेळे दोन्हीं ठायीं।
नसेल तो देईं धीर मना।।५।।

४) अगा ये उदारा अगा विश्वंभरा।
रखुमाईच्या वरा पांडूरंगा।।१।।
अगा सर्वोत्तमा अगा कृष्णा रामा।
अगा मेघःश्यामा विश्वजनि त्या।।धृ।।
अगा कृपावंता जीवन तूं दाता।
अगा सर्व सत्ता धरतिया ।।३।।
अगा सर्व जणा अगा नारायणा।
करुणा-वचना चित्त द्यावें।।४।।
तुका म्हणे नाहीं अधिकार तैसी।
सरती पायांपाशीं केली मागें।।५।।

५) नोंहे दास खरा।
परि हा झालासे डांगोरा ।।१।।
यासी काय करुं आतां।
तू हें सकळ जाणतां ।।धृ।।
नाहीं पुण्या गांठी।
जें हे वेचूं कोणासाठी।।३।।
तुका म्हणें कां उपाधि।
वाढविली कृपानिधी ।।४।।

६) शंखचक्रगदाधरु। कासे सुरंग पितांबरु।
चरणीं ब्रीदाचा तोडरु। असुरावरी काढितसे।।१।।
बरवा बरवा केशवरजा। गरुडवागन चतुर्भुज कंठीं।
कौस्तुभ झळके  वीज। मेघःश्याम देखोनि।।धृ।।
करी सृष्टीची रचना। नाभीं जन्म चुतराननाा।
जग हें वाखाणी मदना। तें लेकरुं तयाचें ।।३।।
कमळा विलासली पायीं। आर्त तुळसीचें ठायीं।
ब्रह्मादिकां अवसरु नाहीं। तो यशोदे वोसंगा।।४।।
उपमा द्यावी  कवणें अंगा। चरणीं जन्मलीं पैं गंगा।
सोळा सहस्त्र रामा संभोगा। नित्य न पुरती कामिनी।।५।।
अधिष्ठान गोदातीरी। ऋध्दिसिध्दी तिष्ठती व्दारीं।
भानुदास पूजा  करी। वाक्पुष्पें अनुपम्य।।६।।

७) समर्पिली वाणी। पांडूरंगी घेते धणी।।१।।
पूजा होती मुक्ताफळीं। रस ओंविया मंगळीं।।धृ।।
धार अंखडित। ओघ चालियेला नित्य।।३।।
पूर्णाहुति जीव। तुका घेऊनि ठेला भाव।।४।।

८) येथूनियां ठाव। अवघे लक्षायाचे भाव।।१।।
उंच देवाचे चरण। तेथें झालें अधिष्ठान।।धृ।।
आघातावेगळा। असे ठाव हा निराळा।।३।।
तुका म्हणे स्थळ। धरुनि राहिलों अचळ।।४।।

९) स्वामीचें हें देणें। येथें पावलों दर्शन ।।१।।
करु आवडीनें वाद। तुमच्या सुखाचा संवाद।।धृ।।
कळावया वर्म। हा तो पायाचाचि धर्म।।३।।
तुका म्हणे सिध्दी। हेचि पावविली बुध्दी।।४।।

१०) कासयानें पूजा करुं केशीराजा।
हाचि संदेह माझा फेडीं आतां ।।धृ।।
उदकें न्हाणूं तरी स्वरुप तें तुझें।
तेथें काय माझें वेंचे देवा।।२।।
गंधाचा सुगंध पुष्णाचा परिमळ।
तेथें मी दुर्बळ काय करुं।।३।।
फळदाता तूंच तांबोल अक्षता।
तेथें काय आतां वाहों तुज।।४।।
वाहूं दक्षिणा तरी धातु नारायण।
ब्रह्म तैंचि अन्न दुजें कायीं।।५।।
गाता तूं ॐकार टाळी नादेश्वर।
नाचावया थार नाहीं कोठें।।६।।
तुका म्हणे मज अवघें तुझें नाम।
धूप दीप रामकृष्ण हरि।।७।।

११) ज्याची खरी सेवा।
त्याच्या भय काय जीवा।।१।।
करितां स्वामीसवें वाद।
अधिक अधिक आनंद।।धृ।।
असावा तो धर्म।
मग साहों जातें वर्म।।३।।
वदे वाग्देवी।
तुका विठ्ठली गौरवी।।४।।

१२) आम्हां हरीच्या दासां कांहीं।
भय नाहीं त्रयलोकीं।।१।।
देव उभा मागें पुढें।
उगवी कोडें संकट।।धृ।।
जैसा केला तैसा होय।
धांवे सोय धरोनी ।।३।।
तुका म्हणे असों सुखें।
गाऊं मुखें विठोबा।।४।।

१३) सेवा ते आवडी उच्चारावें नाम।
भेदाभेद काम निवारोनि।।१।।
नलगे हालावें चालावें बाहेरीं।
अवघेंचि घरीं बैसलियां।।२।।
देवाचींच नामें देवाचिये शिरी।
सर्व अळंकारी समर्पावीं।।३।।
तुका म्हणे होय भावेंचि संतोषी।
वसे नामापाशीं आपुलिया।।४।।

१४) नाम गाऊ नाम ध्याऊं।
नाम विठाबासी वाहूं।।१।।
आम्ही देवाचे दैवाचे।
दास पंढरीरायाचे ।।धृ।।
टाळ दिंडी घेऊनि हाती।
विठ्ठल नाम गाऊ प्रीति।।३।।
नामा म्हणे लाखोली सदा।
अनंत नामें वाहूं गोविंदा।।४।।

१५) अवघ्या उपचारा।
एक मनचि दातारा।।१।।
घ्यावी माझी सेवा।
दीन दुर्बळाची देवा।।धृ।।
अवघियाचा ठाव।
पायांवरी जीव भाव।।३।।
चित्तांचे आसन।
तुका करितों कीर्तन।।४।।

।।भजन-जय जय विठोबा रखुमाई।।

# मालिका ७ वी, अभंग १४

१) चित्तीं तुढे पाय डोळां रुपाचें ध्यान।
अखंड मुखीं नाम तुमचे वार्णवि गुण ।।१।।
हेंचि एक तुम्हां देवा मागणें दातारा।
उचित तें करा माझा भाव जाणोनि।।धृ।।
खुंटलें जाणीव माझें बोलणें आतां।
कळो यावी तैसी करा बळाची चिंता।।३।।
तुका म्हणे आतां नको देऊं अंतर।
न कळे पुढें काय बोलू विचार।।४।।

२) वाट पाहे बाहे निढळीं ठेवूनियां हात।
पंढरीचे वाटे दृष्टि लागलेंसें चित्त।।१।।
कई येतां देखेन माझा मायबाप।
घटिका बोंटे दिवस लेखीं धरोनियां माप।।धृ।।
डावा डोळा लवे उजवी स्फुरतसे बाहे।
मन उतावीळ भाव सांडोनियां देहे।।३।।
सुख शेज गोड चित्तीं नलगे आणिक।
नाठवे घरदार तहान पळाली भूक।।४।।
तुका म्हणे धन्य ऐसा दिवस तो कोण।
पंढरीचें वाटे येता मूळ देखोन।।५।।

३) पडियें दूर देशीं मज आठवें मानसीं।
नको नको हा वियोग कष्ट होताती जीवासी।।१।।
दिन तैसी रजनी झाली गे माये।
अवस्था लाऊनि गेला अझूनि कां न ये।।धृ।।
गरुडवाहना गंभीरा येई गा दातारा।
बापरखुमादेवीवरा श्रीविठ्ठला।।३।।

४.तुझें दास्य करूं आणिका मागों खावया ।
धिग् जालें जिणें माझें पंढरीराया ।।१।।
काय गा विठोबा तुज म्हणावें ।
थोराच्या दैवें गोड शुभअशुभ ।।ध्रु.।।
संसाराचा धाक निरंतर आम्हांसी ।
मरण भलें परि काय अवकळा तैसी ।।३।।
तुझे शरणागत शरण जाऊं आणिकांसी ।
तुका म्हणे कवणा लाज हें कां नेणसी ।।४।।

५) पैल विळाचिये वेळीं आंगणी उबी ठेलिये।
येतिया जातिया पुसे विठ्ठल केऊता गे माये।।१।।
पायरऊ झाला संचारु नवल।
वेधें विंदान लाविलें म्हणे विठ्ठल विठ्ठल।।धृ।।
नेणें तहान भूक नाहीं लाज अभिमान।
वेधिलें जनार्दनीं देवकीनंदनें गे मायें।।३।।
बापरखुमादेविवरु जीवींचा जीवनु।
माझें मनींचे मनोरथ पुरवी कमळनयनु गे माये।।

६.येतिया जातीया पुसे धाडी निरोप

७.येई वो येई वो येई धावोनिया

८.देखिले तुमचे चरण निवांत राहिले मन। कासया त्यजीन प्राण आपुला गे माये।।१।। असेन धणीवरी आपुलें माहेरी।
मग तो श्रीहरी गीती गाईन गे माये।।धृ।। सकळही गोत माझे पंढरीसी जाण। बापरखुमादेवीवरा विठ्ठलाची आण।।३।।

९.गाऊ नाचु विठो तुझा करु अनुवाद।

१०.धन्य दिवस आजि संतांचे दर्शन

धन्य आजि दिन संतदरुशनाचा । बनंत जन्मांचा शीण गेला।।१।।
मज वाटे त्यांसी आलिंगन द्यावे। कदा न सोडावे चरण त्यांचे।।धृ।।
त्रिविध तापांची झाली बोलवण। देखिल्या चरण वैष्णवांचे।।३।।
एका जनार्दनी घडो त्यांचा संग। न व्हावा वियोग माझ्या चित्ता।।४।।

पंढरीसी जावे ऐसे माझे मनी।
विठाई जननी भेटे केव्हां।।१।।
नलगे त्याविण सुखाचा सोहळा।
लागे मज ज्वाळा अग्निचिया।।धृ।।
तुका म्हणे त्याचे पाहिलीया पाय।
मग दु:ख जाय सर्व माझें।।३।।

संपदा सोहळा नावडे मनाला।
करीतें टकळा पंढरीचा।।१।।
जावें पंढरीसी आवडे मनासी।
कधी एकादशी आषाढी हें।।धृ।।
तुका म्हणे ऐसें आर्त ज्याचे मनी।
त्याची चक्रपाणी वाट पाहे।।३।।

भजन : जय जय विठोबा रखुमाई....

....

## श्रीएकनाथ महाराजांचे वासुदेव

१.धन्य जगी तोचि एक हरीरंगी नाचे ।
रामकृष्ण वासुदेव सदास्मरा वाचे ।।१।।
सुखदु:ख समान सकळ जीवांचा कृपाळ ।
ज्ञानाचा उद्‌बोध भक्तिप्रेमाचा कल्लोळ ।।२।।
विषयी विरक्त जया नाही आपपर
संतुष्ट सर्वदा स्वयें व्यापक निर्धार ।।३।।
जाणीव शहाणीव वोझे सांडूनिया दूरी ।
आपण वस्तीकर वर्ततसे संसारी ।।४।।
एका जनार्दनी नित्य हरीचे कीर्तन ।
आसनी शयनी सदा हरीचे चिंतन ।।५।।

२.जया परमार्थी चाड । तेणें सांडावे लिगाड ।
धरुनी भजनाची चाड । नित्य नेम आदरें ।।१।।
सांडी मांडी परती टाकी । वासुदेव नाम घोकी ।
मोक्ष येईल सुखी । नाम स्मरतां आदरे ।।धृ ।।
रामकृष्ण वासुदेवा । धरीं हाची दृढ भावा ।
आणिकाचा हेवा । दुरी करीं आदरें ।।४।।
घालीं संतांसी आसने । पूजा करीं कायावाचामनें ।
एका जनार्दनी जाणे । इच्छिले तें पुरवी ।।५।।

३.सुखे सेऊं ब्रह्मानंदा। गाऊं रामनाम सदा। नोहे मग बाधा। काळदूत यमाची।।१।। करुं वासुदेव स्मरण। तेणें तुटे रे बंधन। खंडेल कर्माचे विंदान। वासुदेव जपताचि।।धृ।। तीर्थयात्रे सुखें जाऊ। वाचे विठ्ठल नाम घेंऊ। संतासंगे सेंऊं। वासुदेव धणीवरी।।३।। लोभममता दवडूं आशा। उदर व्यथेचा वोळसा। न करुं आणिक सायासा। वासुदेवावांचूनी।।४।। मुख्यं वर्माचें हे वर्म। येणे साधे सकळ धर्म। एका जनार्दनी नाम। वासुदेव आवडी।।५।।

४.वासुदेव स्मरण पापहरणाचें मूळ। तीर्थांचे माहेर ब्रह्म व्यापक निश्चळ। अघनासी मुखीं स्मरतां वाचा झाली निर्मळ। त्रिविधताप शोषुनी रुपी स्वरुपी सुमंगळ।।१।। ॐनमो भगवते रामकृष्ण वासुदेवा।।धृ।। जपतप अनुष्ठान व्यर्थ कासया करणें। तीर्थ व्रत यमनेम नलगे दैवता धरणें। आसन मुद्रा ज्ञान ध्यान नलगे वाराणसीं मरणें। केशव माधव अच्युत वदतां होय पातक हरणें।।२।। शरीर शोषण प्राण निरोधन मनोजय हठयोग। गुदपीडन कुडलिनी कलिमलदलभंग। उर्ध्व वायुचा श्र्वेत तोडोनि करीं वो वनभंग। ब्रह्मरंध्रीं मिसळे परि मुमुक्षु दंग।।३।। मनोजय वासना तोडोनि केली बीमोडी। मनपुर नगर पाहतां दुर्गडी मोडी। क्रोध,मद, मत्सर, दंभ, अहंकार झोडी।

५.कर जोडोनि विनवितो तुम्हां। तुम्ही वासुदेव वासुदेव म्हणा। नको गुंतू विषयकामा। तुम्ही आठवा मधुसूदना।।१।। नरदेह दुर्लभ जाणा। शतवर्षांची गणना। त्यामध्ये दुःख यातना। तुम्ही आठवा मधुसूदना।।२।। नलगे तीर्थांचे भ्रमण। नलगे दंडण मुंडण। नलगे पंचाग्नी साधन। तुम्ही आठवा मधुसूदना।।३।। हेचि माझी विनवणी। जोडितो कर दोन्ही। शरण एका जनार्दनी। तुम्ही वासुदेव म्हणा अनुदिनी।।४।।

## श्रीतुकोबारायांचे वासुदेव

१.गातो वासुदेव मी ऐका । चित्त ठायीं ठेवूनि भावे एका ।
डोळें झाकुनि रात्र करु नका । काळ करीत बैसलासे लेखा गा ।।१।।
राम राम स्मरा आधी । लाहो करा गांठ घाला मूळबंधी ।
सांडा वाउगिया उपाधी। लक्ष लावूनि राहा गोविंदा गा।।धृ।।
अल्प आयुष्य मानवी देह। शत गणिलें ते अर्ध रात्र खाय।
मध्यें बालत्व पीडा रोग क्षय। काय भजनासी उरले ते पाहे गां।।३।।
क्षणभंगुर नाही भरवसा। व्हा रे सावध तोडा माया आशा।
कांही न चले मग गळा पडेल फासा। पुंढें हुशार थोर आहे ओळसा गा।।४।।
कांही थोडा बहुत लागपाठ। करा भक्ति भाव धरा बळकट।
तन मन ध्यान द्या लावूनिया नीट। जरी असेल करणें गोड शेवट गा।।५।।
विनवितों सकळजना। कर जोडोनि थोरां लहाना।
दान इतुले द्या मज दीना। म्हणे तुकयाबंधु राम म्हणा गां।।६।।

२.बोल अबोलणें बोलें। जागें बाहेर आत निजेलें।
कैसे घरात घरकुल नेणें। नेणों अंधार ना उजेडलें गा।।१।।
वासुदेव करितो फेरा। वाडियांत बाहेर दारा।
कोणी कांही तरी दान पुण्य करा। जाब नेदा तरी जातो माघारां गा।।धृ।।
हातीं टाळ दिंडी मुंखी नाम गाणें। गजर होतो बहु मोठयाने।
नाही निवडिली थोर लहाने। नका निजों भिकेच्या भेणे गां।।३।।
मी वासुदेव तत्वतां। कळों येईल विचारितां।
आहे ठाऊक सभाग्य संता। नाहीं दुजा आणिक मागता गा।।४।।
काहीं जागा का निजलासी। सुनें जागवूनि दारापाशी।
तुझ्या हितापाठी करी वसवसी। भेटी न घेसी वासुदेवासी गा।।५।।
ऐंसें जागविलें अवघे जन। होतें संचित तिहीं केले दान।
तुका म्हणें दुबळी कोण। गेली वासुदेवासी विसरुनी गा।।६।।

३.राम कृष्ण गीती गात। टाळ चिपळया वाजवित।
छंदे आपुलिया नाचत। नीज घेऊनि फिरत गा।।१।।
जनी वनी अवघां देव। वासनेचा पुसावा ठाव।
मग वोळगा तो वासुदेव। ऐसा मनी वसुद्या भाव गां।। धृ।।
निज दानाची थोर आवडी। वासुदेवासी लागली जोडी।
मुखीं नाम उच्चारी घडोघडी। ऐसी करा वासुदेवीं जोडी गां।।३।।
अवघा सारुनि शेवट झाला। प्रयत्न न चलें काहीं केला।
जागा होई सांडूनि झोपेला। दान देई वासुदेवाला गा।।४।।
तुका म्हणे धन्य त्यांचे जिणें। जिहीं वासुदेवीं घातले दान।
त्या नलगे येणे जाणें। झाले वासुदेवीं राहणें गा।।५।।

४.मनु राजा एक देहपुरी। असे नांदतु त्यासी दोघी नारी।
पुत्रपौत्र संपन्न भारी। तेणें कृपा केली आम्हावरी गा।।१।।
म्हणवुनी आलो या देशा। होतों नाही तरी भुललो दिशा।
दाता तोही मज भेटला इच्छा। येऊनि मार्ग दाविला सरिसा गा।।धृ।।
सवें घेऊनि चौघेजण। आला कुमर सुलक्षण।
कडे चुकवुनि कांटे वन। ऐका आणिली ती कोण कोण गा।।३।।
पुढें भक्तिनें धरिलें हातीं । मागें ज्ञान वैराग्य धर्म येती ।
स्थिर केलीं जीं आचपळें होतीं । सद्धि आणुनि लाविलीं पंथीं गा ।।४।।
केले उपकार सांगों काय । बाप न करी ऐसी माय ।
धर्में त्याच्या देखियेले पाय । दिलें अखय भय वारुनि दान गा ।।५।।
होतों पीडत हिंडतां गांव । पोट भरेना राहावया ठाव ।
तो येणें अवघा संदेह । म्हणे फेडियेला तुकयाचा बंधव गा ।।६।।

५.गेले टळले पाहार तीन । काय निदसुरा अझून ।
जागे होउनि करा कांहीं दान । नका ऐकोनि झाकों लोचन गा ।।१।।
हरी राम कृष्ण वासुदेवा । जाणवितसें जना ।
चिपळ्या टाळ हातीं मुखीं घोष । नारायणा गा ।।ध्रु.।।
जें टाकेल कोणा कांहीं । फळ पुष्प अथवा तोय ।
द्या परी मीस घेऊं नका भाई । पुढें विन्मुख होतां बरें नाहीं गा ।।२।।
देवाकारणें भाव तस्मात । द्यावें न लगे फारसें वित्त।
जालें एक चित्त तरी बहुत । तेवढ्यासाठीं नका करूं वाताहात गा ।।३।।
आलों येथवरी बहु सायासें । करितां दान हें चि मागावयास ।
नका भार घेऊं करूं निरास । धर्म सारफळ संसारास गा ।।४।।
आतां मागुता येईल फेरा । हें तों घडे या नगरा ।
म्हणे तुकयाबंधु धरा । ओळखी नाहीं तरी जाल अघोरा गा ।।५।।

६.ओले मृत्तिकेचे मंदीर

श्रीज्ञानदेवांचे वासुदेव

१.घुळघुळा वाजती टाळ । झणझाणां नाद रसाळ ।
उदो जाला पाहाली वेळ ।उठा वाचे वदा गोपाळरे ।।१।।
कैसा वासुदेव बोलतो बोल । बाळापोटीं माय रिघेल ।
मेलें माणूस जीत उठविल । वेळ काळांतें ग्रासीरे ।।२।।
आतां ऐसेंची अवघे जन तें येतें जातें तयापासून ।
जगीं जग झालें जनार्दन। उदो प्रगटला बिंबले भानरे ।।३।।
टाळाटाळीं लोपला नाद । अंगोअंगींची मुराला छंद ।
भोग भोगितांचि आटला भोग । ज्ञान गिळूनि गावा तो गोविंदरे ।।४।।
गांवा आंत बाहेरी हिंडे आळी । देवो देविची केली चिपळी ।
चरण नसतां वाजे धुमाळी । ज्ञानदेवाची कांति सांवळी ।।५।।

२.बाबा ममतानिशी अहंकार दाट। रामनामे वासुदेवी वाट।
गुरुकृपा वोळले वैकुंठ। तेणें वासुदेवो दिसे प्रगठ गा।।१।।
वासुदेव हरि वासुदेव हरि। रामकृष्ण करी वासुदेवा।।धृ ।।
आला पुंडलिक भक्तराज। तेणें केशव वोळला सहज।
दिधला विठ्ठल मंत्र बीज। तेणे झाले सर्व काज गा।।३।।
राम कृष्ण वासुदेवे। वैष्णव गातातीं आघवे।
दिंडी टाळ प्रेम भावे। वासुदेवी मन सामवे गां।।४।।
शांती क्षमा दया पुरी। वासुदेवो घरोघरी।
आनंद वोसंडला अंबरी। प्रेमें डुले त्रिपुरारी गा।।५।।
वासुदेवी ज्ञेय ज्ञान। ध्यानी मनीं नारायण।
वासुदेवो परिपुर्ण। कैसे क्षरलेंसें चैतन्य गा।।६।।
वासुदेवीं वाहूनि टाळी। पातके गेली अंतराळी।
वासुदेवो वनमाळी। कीर्तन करु ब्रह्ममेळी गा।।७।।
ज्ञानेदेवो वासुदेवी प्रीती पान्हा उजळी दिवी।
टाळ चिपळी धररुनि जीवीं। ध्यान मुद्रा महादेवीं गा ।।८।।

२) जग जोगी जग जोगी। जागेजागे बोलती ।।धृ।।

जागतां जग देव। राखा कांही भाव।।२।।

अवघा क्षेत्रपाळ। पूजावा सकळ।।३।।

पूजावत्र कांहीं। फळ पुष्प तोय ।।४।।

बहुतां दिसां फेरा। आला या नगरां।।५।।

नका घेऊं भार। धर्म तोचि सार।।६।।

तुका मागे दान। द्यावें जी अनन्य।।७।।

।। भजन- वासुदेव हरि पांडुरंग हरि।।

# श्री नाथ महाराजांचे आंधळे पांगुळ

१) पंढरपूर पाटणी गा महाराज सार्वभौम।
पांडुरंग दीनबंधु जयाचे ते नाम।।
आंधळ्या जीवीचे तो जाणतो धर्म।
म्हणोनि आलो गा देई माझे मज वर्म।।ध्रु।।
असोनि हात पाय डोळे जाहलो मी आंधळा।
मुखी नाम तुझे लागला वाचेसी चाळा।।
देऊनि दान माते नाम सांगे ये काळी।
विठोबाचे दान आले ऐसी देईन आरोळी।।
दान पावले संतसंगे भक्तीचे।
एका जनार्दनी अखंड नाम वाचे।।

२)मी माझे कल्पनेने जाहलोसे पांगुळा।
चालता न चलवेचि कोठे न मिळे स्थळ।।
हिंडलो दिशा दाही श्रम जाहला केवळ।
कवण ही भ्रांती वारी कै भेटेल गुरदयाळ।।
धर्म जागो गुरुमहिमा देही दाविला देव।
निवारुनी भवर जाळे अवघा निरसला भेव।।
कर्म त्या अकर्माच्या लागली वाटे ठेसा।
संपत्ती विप्पतीचा मानिला भरवसा।
कन्या पुत्र आप्त जन हा तो सहज वोळसा।
या भ्रमडोही बुडालो धावे गुरुराया सर्वेशा।।
येऊनि गुरुनाथे माथा ठेविला करु।
अज्ञानतिमीर गेले शुध्द मार्ग साचारु।
गर्जत चालियेलो फिटला अज्ञान अंधारु।
एरका जनार्दनी माझा श्रीगुरु उदारु।।

३) मृत्युलोकी एक नगर त्याचे नाव पंढरपूर।
तेथिल मोकाशी उभा असे विटेवर।
पुंडलिक भक्तराज शोभे चंद्रभागातीर।
बोलती साधुसंत जीवा वाटे हुरहुर।।
तुम्ही संत मायबाप येवढा उपकार करा।
न्या मज तेथवरी दाखवा दीनांचा सोयरा।।धृ।।
मज नाही हातपाय डोळा पडली झापड।
कर्ण हे बधिर झाले वाचा बोले बोबड।
नाक मुख गळू लागले लाळ आणि शेंबुड।
श्वानापरी गती झाली अवघे करती हाड हाड।।
साधुसंत मायबाप जे का दयेचे सागर।
भावाचे मुख्य स्थान भक्तीचे ते माहेर।
तिही केले कृपादान मस्तकी ठेविला कर।
माया मोह निरसली शुध्द झाले कलेवर।।
भाव दिला मज सांगते मार्ग दाविला नीट।
भ्रांति हे समुळ गेली दिसु लागली वाट।
नाचत प्रेमछंदे चालू लागलो सपाट।
एका जनार्दनी पावलो पंढरी पेठ।।

# श्री तुकोबारायांचे आंधळे पांगुळ

१) पांगुळ झालों देवा नाहीं हात ना पाय।
बैसलों जयावरी सैरा ते जाय।
खेटितां कुप कांटी खुंट दरडी न पाहे।
आधार नाहीं मज कोणी बाप ना माय।।१।।
दाते हा दान करा जाते पंढरपुरा ।
न्या मज तेथवरी अखमाचा सोयरा।।धृ।।
हिंडतां गव्हाणें गा शिणलों येरझारी।
न मिळेचि दाता कोणी जन्मदुःख निवारी।
किर्ती हे संता मुखीं तोचि दाखवा हरी।
पांगुळां पाय दाते नांदे पंढरपुरी।।३।।
या पोटाकारणें गा झालो पांगिला जना।
न सरेति मायबाप भीक नाहीं खंडणा।
पुढारा म्हणती एक तया नाहीं करुणा।
श्वान हें लागे पाठी आशा बहु दारुणा।।४।।
काय मी चुकलों गा मागें नेणवेंचि कांही।
न कळेचि पापपुण्य येथें आठव नाहीं।
मी माजीं भुललों गा दीप पतंग सोयी।
द्या मज जीवदान संत महानुभाव कांहीं।।५।।
दुरोनी आलो मी गा दुःख झालें दारुण।
यावया येथवरी होतें हेंचि कारण।
दुर्लभ भेटी तुम्हां पायीं झालें दरुषण।
विनवितो तुका संता दोन्ही कर जोडूनी।।६।।

देखत होतो आधी मागे पुढे सकळ।
मग हे दृष्टी गेली वरी आले पडळ।
तिमिर कोंदलेसे वाढे वाढता प्रबळ।
भीत मी झालो देवा काय ज्याल्याचे फळ।।
आता मज दृष्टी देई पांडुरंगा मायबापा।
शरण मी आलो तुज निवारुनिया पापा।
अंजन लेववुनि करी मारग सोपा।
जाईन सिध्दपंथे अवघ्या चुकतील खेपा।।ध्रु।।
होतसे खेद चित्ता काही नाठवे विचार।
जात होतो जनामागे तो हि सांडिला आधार।
हा ना तो ठाव झाला अवघा पडिला अंधार।
फिरली माझी मज कोणी न देती आधार।।
जोवरी चळण गा तोवरी म्हणती माझा।
मानिती लहान थोर देहसुखाचिया काजा।
इंद्रिये मावळली आला बागुल आजा।
कैसा विपरीत झाला तोचि देह नव्हे दुजा।।
गुंतलो या संवसारे कैसा झालोसे अंध।
मी माझे वाढवूनी मायातृष्णेचा बाध।
स्वहित न दिसेचि केला आपुला वध।
लागले काळ पाठी सवे काम हे क्रोध।।
लागती चालता गा गुणदोषांच्या ठेंसा।
सांडिली वाट मार्ग झालो निराळा कैसा।
पाहातो वास तुझी थोर करुनि आशा।
तुका म्हणे वैद्यराजा पंढरीच्या निवासा।।

आंधळ्या पांगळ्याचा एक विठोबा दाता।
प्रसवला विश्व तोचि सर्व होय जाणता।
घडी मोडी हेळामात्रे पापपुण्य संचिता।
भवदु:ख कोण वारी तुजवाचुनी चिंता।।
धर्म का जागो तुझा तूचि कृपाळू राजा।
जाणसी जीवाचे गा न सांगता सहजा।।धृ।।
घातली लोळणी गा पुंडलीके वाळवंटी।
पंढरी पुण्य ठाव नीरे भीवरे तटी।
न देखे दुसरे गा झाली अदृश्य दृष्टी।
वोळला प्रेमदाता केली अमृतवृष्टी।।
आणीक उपमन्यु एक बाळ धाकुटे।
न देखे न चलवे जना चालते वाटे।
घातली लोळणी गा हरिनाम बोभाटे।
पावला त्या कारणे धाव घातली नेटे।।
बैसोनि खोळी शुक राहे गर्भी आंधळा।
शीणला येरझारी दु:ख आठवी वेळा।
मागील सोसले ते ना भी म्हणे गोपाळा।
पावला त्याकारणे लाज राखिली कळा।।
न देखे जो या जना तया दावी आपणा।
वेगळा सुखदु:खा मोहो नाठवी धना।
आपपर तेही नाही बंधुवर्ग सज्जना।
तुकया तेचि परि झाली पावे नारायणा।।

सहज मी आंधळा गा निजनिराकार पंथे।
वृत्ती हे निवृत्ति झाली जन न दिसे तेथे।
मी माझे हरपली ठायी जेथीच्या तेथे।
अदृश्य तेचि झाले काही दृष्य जे होते।।
सुखे मी निजलो गा शून्य सारुनि तेथे।
त्रिकुटशिखरी गा दान मिळे आइते।। धृ।।
टाकिली पात्र झोळी धर्म अधर्म आशा।
कोल्हाळ चुकविला त्रिगुणांचा वोळसा।
न मागे भीक आता हाचि झाला भरवसा।
वोळली सत्रावी गा तिणे पुरविली इच्छा.।।
उर्ध्वमुखे आळविला सोहं शब्दाचा नाद।
अरुप जागविला दाता घेऊनि छंद।
घेऊनि आला दान निजतत्व निजबोध।
स्वरुपी मेळविले नाव ठेवियला भेद।।
शब्द हा बहुसार उपकाराची राशी।
म्हणोनि चालविला मागे येतील त्यांसी।
मागोनी आली वाट सिध्द ओळीची तैसी।
तरले तरती गा आणीकही विश्वासी।।
वर्म ते एक आहे दृढ धरावा भाव।
जाणिव नागवण नेदी लागो ते ठाव।
म्हणोनि संग टाकी सेवी अद्वैत भाव।
तुका म्हणे हाचि संती मागे केला उपाव ।।

# श्री नामदेवरायांचे आंधळे पांगुळ

१) जंबु ह्या द्विपामाजी एक पंढरपूर गांव।
धर्माचे नगर देखा विठो पाटिल त्याचे नाव।
चला जाऊ तया ठाया काही भोजन मागाया।।
विठोबाचा धर्म जागो।
त्याचे चरणी लक्ष लागो।।धृ।।
ज्यासी नाही पंख पाय तेणे करावे ते काय।
शुध्द भाव धरोनिया पंढरपूरासी जावे।
इच्छिले फळ देतो यासी नवलाव ते काय।।
भक्ती आणि भावार्थाचा जेणे गुंफियेला शेला।
विठोबा दाताराच्या घरा उचित नेला।
उशिर न लागता जन्म वेगळा केला।।
सुदामा ब्राह्मण दुःखे दरिद्रे पिडीला।
मुष्टी पोहे घेऊनि त्याचे भेटीलागी गेला।
शुध्द भाव देखोनिया गाव सोनियाचा दिला।।
गण आणि गोत्रज सर्व हासताती मज।
गेले याचे मनुष्यपण येणे सोडियेली लाज।
विनवितो शिंपी नामा संतचरणीचा रज।।

# श्री ज्ञानदेवांचे आंधळे पांगुळ

१) पूर्वजन्मी पाप केले ते हे बहु विस्तारिले।
विषयसुख नाशिवंत सेविता तिमिर कोंदले
चौऱ्यांशी लक्ष योनि फिरता दु:ख भोगिले
ज्ञानदृष्टि हारपली दोन्ही नेत्र आंधळे।।
धर्म जागो सदैवाचा जे बा परउपकारी
आंधळ्या दृष्टि देतो त्याचे नाम मी  मी उच्चारी।।ध्रु।।
संसार दु:खमूळ चहुकडे इंगळ
विश्रांती नाही कोठे रात्रंदिवस तळमळ
कामक्रोध लोभ शुनी पाठी लागली ओढाळ
कवणा मी शरण जाऊ आता दृष्टि देईल निर्मळ।।
मातापिता बंधु बहिणी कोणी न पवती निर्वाणी।
इष्टमित्रस्वजनसखे हे तो सुखाची  सुखाची मांडणी।
एकला मी दु: ख भोगी कुंभपाक जायणी।
तेथे कोणी सोडविना एका सदगुरुवांचुनी।।
साधुसंत मायबाप तिही केले कृपादान।
पंढरिये यात्रे नेले घडले चंद्रभागे स्नान।
पुंडलिक वैद्यराजे पुर्वी साधले साधन।
वैकुंठीचे मूळपीठ डोळा घातले ते अंजन।।
कृष्णांजन एकवेळा डोळा घालता अढळ।
तिमिर दु:ख गेले फिटले भ्रांतीपडळ।
श्रीगुरु निवृत्तिराये मार्ग दाविला सोज्वळ।
बापरखुमादेवीवरु विठ्ठल दीनाचा दयाळ।।

२) देवा तुज चुकलो गा तेणे दृष्टि आले पडळ।
विषयग्रंथी गुंतलोसे तेणे होतसे विव्हळ।
अंध मंद दृष्टि झाली गिळु पाहे हा काळ।
अवचित दैवयोगे निवृत्ति भेटला कृपाळ।।
धर्म जागो निवृत्तिचा तेणे फेडिले पडळ।
ज्ञानाचा निजबोधु विज्ञानरुप सकळ।। ध्रु।।
तिही लोकी विश्वरुप दिव्य दृष्टि दिधली।
द्वैत हे हरपले अद्वैतपणे माऊली।
उपदेश निजब्रह्म ज्ञानांजन साऊली।
चिदरुप दीप पाहे तेथे तनुमनु निवाली।।
दान हेचि आम्हा गोड देही दृष्टि मुराली।
देह हे हारपले विदेहवृत्ति स्पुरली।
विज्ञान हे प्रगटले ज्ञोय ज्ञाता निमाली।
दृष्य ते तदाकार ममता तेथे बुडाली।।
प्रपंचु हा नाही जाणा एकाकार वृत्ति झाली।
मी माझे हरपले विषयांध या बोली।
उपरती सदगुरु बोधु तेथे प्रकृती संचली।
धर्ममार्गे शुध्द पंथ हाती काठी दिधली।।
वेदमार्गे मुनी गेले त्याचि मार्गे चालिलो।
न कळेचि विषयअंधा म्हणोनी उघड बोलिलो।
चालता धनुर्धरा तरंगाकारी हरपलो।
ज्ञानदेव निवृत्तिचा द्वैत सर्व निरसलो।।

भजन : पांडुरंग हरी वासुदेव हरी

# मुका

१) मुका झालो वाचा गेली।।ध्रु।।
होतो पंडित महाज्ञानी। दशग्रंथी षड्शास्त्र पुराणी।
चारी वेद मुखोदगत वाणी। गर्वामध्ये झाली सर्व हानी।।
जिव्हा लाचावली भोजना। दुग्ध घृत शर्करा पक्वान्ना।
निंदिले उपान्ना। तेणे पावलो मुखबंधना।।
साधुसंतांची निंदा केली। हरिभक्तांची स्तुती नाही केली।
तेणे वाचा पंगु झाली। एका जनार्दनी कृपा लाधली।।

# बहिरा

१) बहिरा झालो या जगी।।ध्रु।।
नाही ऐकले हरिकीर्तन। नाही केले पुराण श्रवण।
नाही वेदशास्त्र पठण। गर्भी बहिरा झालो त्या गुणे।।
नाही संतकिर्ती श्रवणी आली। नाही साधुसेवा घडियेली।
पितृवचनासी पाठ दिधली। तीर्थव्रते असोनि त्यागिली।।
माता माऊली पाचारिता। शब्द नाही दिला मागुता।
बहिरा झालो नरदेही येता। एका जनार्दनी स्मरेन आता।।

# गौळण

१) यातिकुळ माझें गेलें हारपोनि। श्रीरंगावांचूनी अनु नेणें।।१।।
किती वो शिकवाल मज वेळोवेळां। मी तया गोवळा रातलिये ।।धृ।।
अष्टभोग भोगणें मातें नाहीं चाड। भक्तिप्रेम गोड लेइलें गे माये।।३।।
बापरखुमादेविवरु जीवींचा जिव्हाळा। काहीं केलिया वेगळा नव्हे गे माये।।४।।

# श्री ज्ञानेश्वर महाराजकृत संपूर्ण  हरिपाठ

।।राम कृष्ण हरि।।

सुंदर ते ध्यान उभें विटेवरीं।
कर कटावरीं ठेवोनियां।।१।।
तुळशीहार गळां कासे पितांबर।
आवडे निरंतर हेंचि ध्यान ।।२।।
मकर कुंडलें तळपती श्रवणीं।
कंठी कौस्तुभमणी विराजित।।३।।
तुका म्हणे माझें हेचि सर्वसुख।
पाहीन श्रीमुखी आवडींने।।४।।

(हरिपाठाचे सर्व अभंगाना धृपद-हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा।
पुण्याची गणना कोण करी।। हे आहे)

१) देवाचिये व्दारीं उभा क्षणभरी।
तेणें मुक्ति चारी साधियेल्या।।१।।
हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा।
पुण्याची गणना कोण करी ।।२।।
असोनि संसारीं जिव्हें वेगु करीं।
वेदाशास्त्र उभारी बाह्य सदा।।३।।
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा।
व्दारकेचा राणा पांडवा घरी।।४।।

२) चहूं वेदीं जाण साहिशास्त्री कारण।
अठराहीं पुराणें हरिसी गाती ।।१।।
मंथुनी नवनीता तैसें घें अनंता।
वायां व्यर्थ कथा सांडी मार्गे।।२।।
एक हरि आत्मा जीव शिव सम।
वायां तूं दुर्गमा न घालीं मन।।३।।
ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ।
भरला घनदाट हरि दिसे।।४।।

३) त्रिगुण असार निर्गुण हें सार।
सारसार विचार हरिपाठ।।१।।
सगुण निर्गुण गुणांचे अगुण।
हरिवीण मन व्यर्थ जाय।।२।।
अव्यक्त निराकार नाहीं ज्या आकार।
जेथोनि चराचर हरीसी भजें।।३।।
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं।
अनंत जन्मोंनी पुण्य होय।।४।।

४)भावेंवीण भक्ति भक्तिवीण मुक्ति।
बळेंवीण शक्ति बोलूं नये।।१।।
कैसेनि दैवत प्रसन्न त्वरीत।
उगा राहें निवातं शिणसी वायां।।२।।
सायासें करिसी प्रपंच दिननिशीं।
हरिसी न भजसी कवण्या गुणें।।
ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें।
तुटेल धरणे प्रपंचाचें।।४।।

५) योग याग विधी येणें नोहे सिध्दी।
वायांचि उपाधि दंभ धर्म।।१।।
भावेवीण देव न कळे निःसंदेह।
गुरुवीण अनुभव कैसा कळे।।२।।
तपेंवीण दैवत दिधल्यावीण प्राप्त।
गुजेंवीण हित कोण सांगे।।३।।
ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात।
सांधूंचे संगतीं तरणोपाय।।४।।

६) साधूबोध झाला तो नुरोनियां ठेला।
ठायींच मुरला अनुभव।।१।।
कापुराची वाती  उजळली ज्योती।
ठायींच समाप्ती झाली जैसी।।२।।
मोक्षरेखें आला भाग्ये विनटला।
साधूंचा अंकिला हरिभक्त ।।३।।
ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं।
हरि दिसे जनीं वनी आत्मतत्वीं।।४।।

७) पर्वतांप्रमाणें पातक करणें।
वज्रलेप होणें अभक्तांसी ।।१।।
नाहीं ज्यांसी भक्ति ते पतित अभक्त।
हरिसी न भजत दैवहत।।२।।
अनंत वाचाळ बरळती बरळ।
त्या कैंचा गोपाळा पावे हरि।।३।।
ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान।
सर्वांघटीं पूर्ण एक नांदे।।४।।

८) संतांचे संगती मानोमार्ग गती।
आकळावा श्रीपती येणें पंथे।।१।।
रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा।
आत्मा जो शिवाचा रामजप।।२।।
एक तत्व नाम साधिती साधन।
व्दैताचें बंधन न बाधिजे।।३।।
नामामृत गोडी वैष्णवा लाधली।
योगियां साधली जीवनकळा।।४।।
सत्वर उच्चार प्रल्हादी बिंबला।
उध्दवा लाधला कृष्ण दाता।।५।।
ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ।
सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे।।६।।

९) विष्णुवीण जप व्यर्थ त्यांचे ज्ञान।
रामकृष्णीं मन नाहीं ज्यांचे।।१।।
उपजोनि करंटा नेणे अव्दैत वाटा।
रामकृष्णीं पैठा कैसा होय।।२।।
व्दैताची झाडणी गुरुवीण ज्ञान।
तया कैंचे कीर्तन घडें नामीं।।३।।
ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान।
नामपाठ मीन प्रपंचाचें।।४।।

भजन- ।। रामकृष्णहरि जय जय रामकृष्णहरि।।

१०) त्रिवेणी संगमीं नान तीर्थे भ्रमीं।
चित्त नाहीं नामीं तरी तें व्यर्थ।।१।।
नामासी विन्मुख तो नर पापि।
हरिविण धांवया न पावे कोणी।।२।।
पुराणप्रसिध्द बोलिले वाल्मिक।
नामें तिन्ही लोक उध्दरती।।३।।
ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरिचें।
परंपरा त्यांचे कुळ शुध्द।।४।।

११) हरि उच्चारणीं अनंत पापराशी।
जातील लयासी क्षणमात्रें ।।१।।
तृण अग्निमेळें समरस झालें।
तैसें नामें केलें जपतां हरि।।२।।
हरि उच्चारण मंत्र हा अगाध।
पळे भूतबाधा भेणें तेथें।।३।।
ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ।
न करवे अर्थ उपनिषदां।।४।।

१२) तीर्थ व्रत नेम भावेविण सिध्दी।
वायांचि उपाधी करिसी जन।।१।।
भावबळें आकळे येऱ्हवी नाकळे।
करतळीं आंवळे तैसा हरि।।२।।
पारियाचा रवा घेतां भूमीवरीं।
यत्न परोपरी साधन तैसें।।३।।
ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण।।
दिधेलें संपुर्ण माझे हातीं।।४।।

१३) समाधि हरिची समसुखेंवीण।
न साधेल जाण व्दैतबुध्दी ।।१।।
बुध्दींचें वैभव अन्य नाहीं दुजे।
एका केशवराजें सकळ सिध्दि।।२।।
ऋध्दि सिध्दि निधी अवघीच उपाधी।
जंव त्या परमानंदीं मन नाहीं।।३।।
ज्ञानदेवीं रम्य रमलें समाधान।
हरीचें चिंतन सर्वकाळ।।४।।

१४) नित्य सत्यामित हरिपाठ ज्यासी।
कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ।।१।।
रामकृष्ण उच्चार अनंत राशी तप।
पापाचे कळप पळती पुढें।।२।।
हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा।
म्हणती जे वाचा तया मोक्ष।।३।।
ज्ञानदेवा पाठ नारायण नाम।
पावीजे उत्तम निजस्थान।।४।।

१५) एक नाम हरि व्दैत नाम दुरी।
अव्दैत कुसरी विरळा जाणे।।१।।
समबुध्दि घेंता समान श्रीहरि।
शमदमा वरी हरि झाला।।२।।
सर्वाघटीं राम देहादेहीं एक।
सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मी।।३।।
ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा।
मागिलिया जन्मा मुक्त झालों।।४।।

१६) हरि बुध्दि जपे तो नर दुर्लभ।
वाचेसि सुलभ रामकृष्ण।।१।।
रामकृष्ण नामीं उन्मनी साधली।
तयासी लाधली सकळ सिध्दि।।२।।
सिध्दि बुध्दि धर्म हरिपाठीं आले।
प्रपंची निवाले साधुसंगें।।३।।
ज्ञानदेवीं नाम रामकृष्ण ठसा।
येणें दशदिशा आत्माराम।।४।।

१७) हरिपाठ कीर्ति मुखें जरी गाय।
पवित्रचि होय देह त्याचा।।१।।
तयाचें सामर्थ्ये तपिन्नला अमूप।
चिरंजीव कल्प वैकुंठीं नांदे।।२।।
मातृपितृभ्राता सगोत्र अपार।
चतुर्भुज नर होऊनि ठेले।।३।।
ज्ञानगूढ गम्य ज्ञानदेव लाधलें।
निवृत्तीनें दिधलें माझ्या हातीं।।४।।

१८) हरिवंश पुराण हरिनाम संकीर्तन।
हरिविण सौजन्य नेणे कोणी।।१।।
तया नर लाधलें वैकुंठ जोडलें।
सकळही घडलें तीर्थाटन।।२।।
मनोमार्गे गेला तो तेथें मुकला।
हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य।।३।।
ज्ञानदेव गोडी हरिनामाची जोडी।
रामकृष्णीं आवडी सर्वकाळ।।४।।

भजन- ।।जय जय विठोबा रखुमाई।।

१९) नाम संकीर्तम वैष्णवांची जोडी।
पापें अनंत कोटी गेलीं त्यांचीं।।१।।
अनंत जन्माचें तप एक नाम।
सर्व मार्ग सुगम हरिपाठ।।२।।
योगयाग क्रिया धर्माधर्म माया।
गेले ते विलया हरिपाठें।।३।।
ज्ञानदेवी यज्ञ याग क्रिया धर्म।
हरिविण नेम नाहीं दुजा।।४।।

२०) वेदशास्त्र प्रमाण श्रुतीचें वचन।
एक नारायण सार जपा।।१।।
जप तप कर्म हरिविण धर्म।
वाउगाचि श्रम व्यर्थ जाय।।२।।
हरिपाठीं गेले ते निवांतचि ठेले।
भ्रमर गुंतले सुमनकळिकें।।३।।
ज्ञानदेवीं मंत्र हरिनामाचें शस्त्र।
यमें कुळगोत्र वर्जियेलें।।४।।

२१) काळवेळ नाम उच्चारितां नाहीं।
दोन्ही पक्ष पाहीं उध्दरती।।१।।
रामकृष्ण नाम सर्व दोषा हरण।
जड जीवा तारण हरि एक।।२।।
हरिनाम सार जिव्हा या नामाची।
उपमा त्या दैवाची कोण वाणी।।३।।
ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ।
पूर्वजां वैकुंठ मार्ग सोपा।।४।।

२२) नित्य नेम नांमी ते प्राणी दुर्लभ।
लक्ष्मीवल्लभ तयाजवळीं।।१।।
नारायण हरि। नारायण हरि।
भुक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या।।२।।
हरिविणें जन्म नर्कचि पैं जाणा।
यमाचा पाहुणा प्राणी होय।।३।।
ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड।
गगनाहूनि वाड नाम आहे।।४।।

२३) सात पांच तीन दशकांचा मेळा।
एक तत्वीं कळा दावी हरि।।१।।
तैसें नव्हे नाम सर्वत्रा वरिष्ठ।
तेथें कांहीं कष्ट न लगती।।२।।
अजपा जपणें उलट प्राणाचा।
तेथेंही मनाचा निर्धारु असे।।३।।
ज्ञानदेवा जिणे नामेंविण व्यर्थ।
रामकृष्णीं पंथ क्रमियेला।।४।।

२४) जप तप कर्म क्रिया नेम धर्म।
सर्वांघटीं राम भाव शुध्द।।१।।
न सोडी रे भावो टाकीं रे संदेहो।
रामकृष्ण टाहो नित्य फोडीं।।२।।
जात वित्त गोत कुळशील मात।
भजें कां त्वरित भावनायुक्त ।।३।।
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं।
वैकुंठभवनीं घर केलें।।४।।

२५) जाणीव नेणीव भगवंती नाहीं।
उच्चारणी पाहीं मोक्ष सदा।।१।।
नारायण हरि उच्चार नामाचा।
तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं।।२।।
तेथील प्रमाण नेणवें वेंदासी।
तें जीव जंतुसी केंवी कळे।।३।।
ज्ञानदेवा फळ नारायण पाठ।
सर्वत्र वैकुंठ केलें असे।।४।।

२६) एकतत्व नाम दृढ धरीं मना।
हरिसी करुणा येईल तुझी।।१।।
तें नाम सोपें रे रामकृष्ण गोविंद।
वाचेसी सद्‌गद जपें आधीं।।२।।
नामापरतें तत्व नाहीं रे अन्यथा।
वायां आणिक पंथा जाशी झणीं ।।३।।
ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी।
धरोनी श्रीहरि जपें सदा।।४।।

२७) सर्व सुख गोडी साहीशास्त्रें निवडी।
रिकामा अर्धघडी राहूं नको।।१।।
लटिका व्यवहार सर्व हा संसार।
वायां येरझार हरिविण।।२।।
नाममंत्र जप कोटी जाईल पाप।
कृष्णनामीं संकल्प धरुनि राहें।।३।।
निजवृत्ति काढी सर्व माया तोडीं।
इंद्रिया सवडीं लपों नको।।४।।
ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवी ज्ञान।
समाधि संजीवन हरिपाठ।।६।।

सूचना - या अंभगाचें शेवटचें चरण सर्वांनी उभे राहून म्हणावे व चरण पूर्ण झाल्यानंतर भूमीस स्पर्श करुन स्वतःभोवती पूर्ण प्रदक्षणा घालावीं।

।।पुंडलिक वरदा हरि विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम।।

२८) नामसंकीर्तन साधन पैं सोंपें।
जळतील पांपे जन्मांतरीची।।१।।
न लगती सायास जावें वनांतरा।
सुखें येतो घरा नारायण।।२।।
ठायींच बैसोनि करा एक चित्त।
आवडी अनंत आळवाव।।३।।
रामकृष्णहरि विठ्ठल केशवा।
मंत्र हा जपावा सर्वकाळ।।४।।
याविण आणिक असतां साधन।
वाहतसें आण विठोबाची।।५।।
तुका म्हणे सोपें आहे सर्वाहूनि।
शहाणा तो धणी घेतो येथें।।६।।

२९) देवाचिये व्दारी उभा क्षणभरी।
(संपूर्ण अभंग म्हणणें)

।। भजन - जय जय विठोबा रखुमाई।।

ज्ञानोबारायांचे हरिपाठानंतर सर्व वारकरी समाजामध्ये पुढील गुरुपरंपरेचे अभंग म्हणतात.

# गुरुपरंपरेचे अभंग

१) सत्य गुरुरायें कृपा मज केली।
परि नाहीं घडली सेवा कांहीं।।१।।
सांपडविलें वाटें जातां गंगास्नाना।
मस्तकीं तो जाणा ठेविला कर।।२।।
भोजना मागती तूप पावशेर।
पडिला विसर स्वप्नामाजीं।।३।।
काय कळें उपजला अंतराय।
म्हणोनिंया काय त्वरा झाली।।४।।
राघव चैतन्य केशव चैतन्य।
सांगितली खूण मालिकेची।।५।।
बाबाजी आपुलें सांगितलें नाम।
मंत्र दिला रामकृष्णहरि।।६।।
माहो शुध्द दशमी पाहूनि गुरुवार।
केला अंगीकार तुका म्हणे।।७।।

२) माझियें मनींचा जाणोनियां भाव।
तो करी उपाव गुरुराव।।१।।
आवडीचा मंत्र सांगितला सोपा।
जेणें नोहे गुंफा काहीं कोठें ।।२।।
जाती पुढें एक उतरले पार।
हा भवसागर साधुसंत ।।३।।
जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी।
उतार सांगडी ताफे पेटे।।४।।
तुका म्हणे मज दावियेला तारु।
कृपेचा सागरु पांडूरंग।।५।।

३) घालूनियां भार राहिलों निश्चिंती।
निरविलें संतीं बिठोबासी।।१।।
लावूनियां हात कुरवाळिला माथा।
सांगितलें चिंता न करावी।।२।।
कटीं कर समचरण साजिरें।
राहिसा भीवरे तीरीं उभा।।३।।
खुंटले सायास आणिक या जीव।
धरिले केशवा पाय तुझे।।४।।
तुज वाटें आतां तें करी अनंता।
तुका म्हणे संता लाज माझी।।५।।

४) माझियें मनींचा आणा हा निर्धार।
जिवासी उदार झालों आता।।१।।
तुजविण  दुजें धरीं आणिक।
भय लज्जा शंका टाकियेली।।धृ।।
ठायींचा संबंध तुजमय होता।
विशेष अनंता केला संतीं।।३।।
जीवभाव तुझ्या ठेवियला पायीं।
हेचि आतां नाहीं लाज तुम्हां।।४।।
तुका म्हणे संतीं घातला हवालां।
न सोडीं विठ्ठला पाय तुझे।।५।।

५) माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव।
आपणचि देव होय गुरु।।१।।
पढिये देहभाव पुरवी वासना।
अंती तें आपणापाशीं न्यावे।।२।।
मागें पुढें उभा राहे सांभाळीत।
आलिया आघात निवारावें।।३।।
योग क्षेम त्यांचें जाणे जडभारी।
वाट दावी करीं धरुनियां ।।४।।
तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं।
पाहावें पुराणी विचारुनी।।५।।

६) आदिनाथ उमा बीज प्रगटिलें।
माच्छिंद्र लाधलें सहज स्थितीं।।१।।
तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली।
संपूर्ण कृपा केली गहिनीनाथा।।२।।
वैराग्यें तापला सप्रेमें निवाला।
ठेवा जो लाधला शांतिसुख।।३।।
निर्व्दंव्द निःशंक विचरतां महीं।
सुखानंद हृदयीं स्थिरावला ।।४।।
विरक्तींचे पात्र अन्वयाचें मुख।
देऊनि सम्यक अनन्यता।।५।।
निवृत्ती गहिनी कृपा केली पूर्ण।
कुळ हें पावन कृष्णनामें।।६।।

७) आदिनाथ गुरु सकळ सिध्दांचा।
मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ।।१।।
मच्छिंद्रानें बोध गोरक्षासी केला।
गोरक्ष बोळला गहिनीप्रति।।२।।
गहिनीप्रसादें निवृत्ती दातार।
ज्ञानदेवा सार चोजविलें।।३।।

८) अवघेंचि त्रैलाक्य आनंदाचें आतां।
चरणीं जगन्नाथा चित्त ठेलें।।१।।
माय जगन्नाथ बाप जगन्नाथ।
अनाथाचा नाथ जनार्दन।।२।।
एका जनार्दनीं एकपणें उबा।
चैतन्याची शोभा शोभतसे।।३।।

९) अवघाचि ससांर सुखाचा करीन।
आनंदे भरीन तिन्ही लोक।।१।।
जाईन गे माय तया पंढरपुरा।
भेटेन माहेरा आपुलिया।।२।।
सर्व सुकृतांचे फळ मी लाहीन।
क्षेम मी देईन पांडूरंगा।।३।।
बापरखुमादेवीवरु विठ्ठलेंसी भेटी।
आपुले संवसाटीं करुनि ठेला।।४।।

१०) कोण पुण्यें यांचा होईन सेवक।
जीहीं व्दंव्दादिक दुराविलें।।१।।
ऐसीं वर्मे मज दावीं नारायणा।
अंतरीच्या खूणा प्रगटोनि।।२।।
बहु अवघड असे संत भेटी।
तरी जगजेठी करुणा केली।।३।।
तुका म्हणे मग नये वृत्तीवरी।
सुखाचे शेजारी पहुडोनि।।४।।

।। भजन- ज्ञानोबा तुकाराम।।

१) श्रीगुरुसारिखा असतां पाठीराखा।
इतरांचा लेखा कोण करी।।१।।
राजयाची कांता काय भीक मागे।
मनाचियां जोगे सिध्दी पावे।।२।।
कल्पतरु तळवटीं जो कोणी बैसला।
काय वाणी त्याला सांगिजो जी।।३।।
ज्ञानदेव म्हणे तरलों तरलों।
आतां उध्दारिलों गुरुकृपे।।४।।

२) इवलेसें रोप लावियेलें व्दारी।
त्याचा वेलू गेला गगनावरी।।१।।
मोगरा फुलला मोगरा फुलला।
फुलें वेंचितां अति भारु कळियासि आला।।२।।
मनाचिये गुंतीं गुंफियेला शेला।
बापरखुमादेविवरु विठ्ठलीं अर्पिला।।३।।

३) कृपाळु सज्जन तुम्ही संतजन।
हेचिं कृपादान तुमचे मज।।१।।
आठवण तुम्ही द्यावी पांडूरंगा।
कीव माझी सांगा काकुळती।।२।।
अनाथ अपराधी पतित आगळा।
परि पायां वेगळा नका करु।।३।।
तुका म्हणे तुम्ही निरविल्यावरी।
मग मज हरि उपेक्षीना।।४।।

भजन - विठ्ठल। जय विठ्ठल।

१) बोलिली लेकुरे। वेडी वाकुडी उत्तरे।।१।।
करा क्षमा अपराध। महाराज तुम्ही सिध्द।।२।।
नाही विचारिला। अधिकार म्यां आपुला।।३।।
तुका म्हणे ज्ञानेश्वरा। राखा पायांपे किंकरा।।४।।

भजन : ज्ञानदेव तुकाराम। ज्ञानदेव तुकाराम।।

१) झाले समाधान। तुमचे देखिल चरण।।१।।
आता उठावेसे मना। येत नाही नारायणा।।२।।
सुरवाडिकपणें। येथे सांपडलें केणें।।३।।
तुका म्हणे भोग। गेला निवारला लाग।।४।।

२) करुनि आरती। आतां ओवाळूं श्रीपती।।१।।
आजी पुरले नवस। धन्य काळ हा दिवस।।२।।
पाहा वो सकळा। पुण्यवंता तुम्ही बाळा।।३।।
तुका वाहे टाळी। उभा सन्निध जवळी।।४।।

३) प्रेम सप्रेम आरती। गोविंदाते ओवाळिती।।१।।
धन्य धन्य ते लोचन। नित्य करिती अवलोकन।।२।।
बाळा प्रौढा आणि मुग्धा। ओवाळिती परमानंदा।।३।।
नामा म्हणे केशवाते। देखुनि राहिलो तटस्थ।।४।।

# श्री एकनाथ महाराजकृत हरिपाठ

१.हरीचिया दासा हरि दाही दिशा । भावें जैसा तैसा हरि एक।।१।।
हरी मुखीं गातां हरपली चिंता । त्या नाहीं मागुता जन्म घेणें।।२।।
जन्म घेणें लागे वासनेच्या संगे । तेचि झालीं अंगें हरिरुप।।३।।
हरिरुप झालें जाणीव हरपले । मीतूंपणा गेलें हरीचे ठायीं ।।४।।
हरिरुप ध्यानीं हरिरुप मनीं । एका जनार्दनीं हरि बोला ।।५।।

हरि बोला हरि बोला नातरी अबोला । व्यर्थ गलबला करूं नका ।।१।।
नको अभिमान नको नको मान । सोडीं मीतूंपण तोचि सुखी ।।२।।
सुखी त्याणें व्हावें जगा निववावें । अज्ञानी लावावे सन्मार्गासी ।।३।।
मार्ग जया कळे भावभक्तिबळें । जगाचिये मेळे न दिसती।।४।।
जनीं वनीं प्रत्यक्ष लोचनीं । एका जनार्दनीं ओळखिलें ।।५।।

ओळखिला हरी धन्य तो संसारी । मोक्ष त्याचे घरीं सिद्धीसहित ।।१।।
सिद्धी लावी पिसें कोण तया पुसे । नेलें राजहंसें पाणी काय ।।२।।
काय तें करावें संदेहीं निर्गुण । ज्ञानानें सगुण ओस केलें ।।३।।
केलें कर्म झालें तेंचि भोगा आलें । उपजले मेले ऐसे किती ।।४।।
एरका जनार्दनीं नाहीं यातायाती । सुखाची विश्रांती हरीसंगें ।।५।।

जें जें दृष्टी दिसे तें तें हरिरुप । पूजा ध्यान जप त्यासी नाहीं ।।१।।
वैकुंठ कैलासी तीर्थक्षेत्रीं देव । तयाविण ठाव रिता कोठें ।।२।।
वैष्णवांचें गुह्य मोक्षांचा एकांत । अनंतासी अंत पाहतां नाहीं ।।३।।
आदि मध्य अवघा हरि एक । एकाचे अनेक हरि करी ।।४।।
एकाकार झाले जीव दोन्ही तिन्ही । एका जनार्दनीं ऐसें केलें।।५।।

नामाविण मुख सर्पाचें तें बीळ । जिव्हा काळसर्प आहे ।।१।।
वाचा नव्हे लांब जळो त्याचें जिणें । यातना भोगणें यमपुरीं ।।२।।
हरीविण कोणी नाहीं सोडविता । पुत्र बंधु कांता संपत्तिचे ।।३।।
अंतकाळीं कोणी नाहीं बा सांगाती । साधूचे संगतीं हरी जोडे ।।४।।
कोटि कुळें तारी हरि अक्षरें दोन्ही । एका जनार्दनीं पाठ केलीं ।।५।।

धन्य माय व्याली सुकृताचें फळ । फळ निर्फळ हरीविण ।।१।।
वेदांताचें बीज हरि हरि अक्षरें । पवित्र सोपारें हेंचि एक ।।२।।
योग याग व्रत नेम दानधर्म । नलगे साधन जपतां हरि ।।३।।
साधनाचें सार नाम मुखीं गातां । हरि हरि म्हणतां कायसिद्धी ।।४।।
नित्य मुक्त तोचि एक ब्रह्ज्ञानी । एका जनार्दनीं हरि बोला ।।५।।

बहुतां सुकृतें नरदेह लाधला । भक्तीविण गेला अधोगती ।।१।।
पाप भाग्य कैसे न सरेचि कर्म । न कळेचि वर्म अरे मूढा ।।२।।
अनंत जन्मींचें सुकृत पदरीं । त्याचे मुखीं हरि पैठा होय ।।३।।
राव रंक हो कां उंच नीच याती । भक्तीविण माती मुखीं त्याच्या ।।४।।
एका जनार्दनीं हरि हरि म्हणतां । मुक्ती सायुज्यता पाठी लागे ।।५।।

हरिनामामृत सेवी सावकाश । मोक्ष त्याचे भूस दृष्टीपुढें ।।१।।
नित्य नामघोष जयाचे मंदिरीं । तेचि काशीपुरी तीर्थक्षेत्र ।।२।।
वाराणसी तीर्थक्षेत्रा नाश आहे । अविनाशासी पाहे नाश कैचा ।।३।।
एका तासामाजीं कोटि वेळा सृष्टी । होती जाती दृष्टि पाहें तोचि ।।४।।
एरका जनार्दनीं ऐसें किती झालें । हरिनाम सेविलें तोचि एक ।।५।।

भक्तीविण पशु कशासी वाढला । सटवीने नेला कैसा नाहीं ।।१।।
काय माय गेली होती भूतापासीं । हरि न ये मुखासी अरे मूढा।।२।।
पातकें करिता पुढें आहे पुसता । काय उत्तर देतां होशील तूं ।।३।।
अनेक यातना यम करवील । कोण सोडवील तेथें तुजला ।।४।।
एका जनार्दनीं सांगताहें तोंडें । आहा वाचा रडे बोलतांचि ।।५।।

।। भजन - जय जय राम कृष्ण करी।।

स्वहिताकारणें संगती साधूची । भावें भक्ति हरीची भेटी तेणें ।।१।।
हरि तेथें संत संत तेथें हरी । ऐसें वेद चारी बोलताती ।।२।।
ब्रह्मा डोळसातें वेदार्थ ना कळे । तेथें हे आंधळे व्यर्थ होती ।।३।।
वेदार्थाचा गोंवा कन्याभिलाष । वेदें नाहीं ऐसें सांगितलें।।४।।
वेदांचीं हीं बीजाक्षरें हरी दोनी । एका जनार्दनीं हरि बोला ।।५।।

सत्पद तें ब्रह्म चित्पद तें माया । आनंदपदीं जया म्हणती हरी ।।१।।
सत्पद निर्गुण चित्पद सगुण । सगुण निर्गुण हरिपायीं ।।२।।
तत्सदिति ऐसें पैल वस्तूवरी । गीतेमाजी हरि बोलियेले ।।३।।
हरिपदप्राप्ती भोळ्या भाविकांसी । अभिमानियांसी नर्कवास ।।४।।
अस्ति भाति प्रिय ऐशीं पदें तिनी । एका जनार्दनीं तेंचि झालें ।।५।।

नाकळे तें कळे कळे तें नाकळे । वळे तें ना वळें गुरुविणें ।।१।।
निर्गुण पावलें सगुणीं भजतां । विकल्प धरितां जिव्हा झडे ।।२।।
बहुरूपी घरी संन्यासाचा वेष । पाहोन तयास धन देती ।।३।।
संन्याशाला नाहीं बहुरूपियाला । सगुणीं भजला तेथें पावे ।।४।।
अद्वैताचा खेळ दिसे गुणागुणीं । एका जनार्दनीं ओळखिलें ।।५।।

ओळखिला हरि सांठविला पोटीं । होतां त्याची भेटी दुःख कैंचें ।।१।।
नर अथवा नारी हो कां दुराचारी । मुखीं गातां हरि पवित्र तो ।।२।।
पवित्र तें कुळ धन्य त्याची माय । हरि मुखें गाय नित्य नेमें ।।३।।
काम क्रोध लोभ जयाचे अंतरीं । नाहीं अधिकारी ऐसा येथें।।४।।
वैष्णवांचें गुह्य काढिलें निवडुनी । एका जनार्दनीं हरि बोला ।।५।।

हरि बोला देतां हरि बोला घेतां । हांसतां खेळतां हरि बोला ।।१।।
हरि बोला गातां हरि बोला खातां । सर्व कार्य करितां हरि बोला ।।२।।
हरि बोला एकांतीं हरि बोला लोकांतीं । देहत्यागांतीं हरि बोला ।।३।।
हरि बोला भांडतां हरि बोला कांडतां । उठतां बैसतां हरि बोला।।४।।
हरि बोला जनीं हरि बोला विजनीं । एका जनार्दनीं हरि बोला ।।५।।

एक तीन पांच मेळा पञ्चवीसांच । छत्तिस तत्त्वांचा मूळ हरि ।।१।।
कल्पना अविद्या तेणे झाला जीव । मायोपाधी शिव बोलिजेति ।।२।।
जीव शिव दोन्ही हरिरूपीं तरंग । सिंधु तो अभंग नेणें हरी ।।३।।
शुक्तीवरी रजत पाहतां डोळां दिसे । रज्जूवरी भासे मिथ्या सर्प।।४।।
क्षेत्र/-क्षेत्रज्ञातें जाणताती ज्ञानी । एका जनार्दनीं हरि बोला ।।५।।

कल्पनेपासूनी कल्पिला जो ठेवा । तेणें पडे गोंवा नेणे हरी ।।१।।
दिधल्या वांचूनि फळप्राप्ति कैंची । इच्छा कल्पनेची व्यर्थ बापा ।।२।।
इच्छावे ते जवळी चरण हरीचे । चरण सर्व नारायण देतो तुज ।।३।।
न सुटे कल्पना अभिमानाची गांठी । घेतां जन्म कोटी हरि कैंचा।।४।।
एका जनार्दनीं सांपडली खूण । कल्पना अभिमान हरि झाला ।।५।।

काय पद्मनीचे षंढासी सोहळे । वांझेसी दोहाळे कैची होती ।।१।।
अंधापुढें दीप खरासी चंदन । सर्पासी दुधपान करूं नये ।।२।।
क्रोधि अविश्वासी त्यासी बोध कैंचा । व्यर्थ आपुली वाचा शिणवूं नये ।।३।।
खळाची संगती उपयोगासी न ये । आपणा अपाय त्याचे संगे ।।४।।
वैष्णवीं कुपथ्य टाकिल वाळूनी । एका जनार्दनीं तेचि भले ।।५।।

।। भजन - जय जय विठोबा रखुमाई।।

न जायेचि ताठा नित्य खटाटोप । मण्डुकीं वटवट तैसे ते गा ।।१।।
प्रेमावीण भजन नाकाविण मोती । अर्थाविण पोथी वाचुनी काय ।।२।।
कुंकवा नाहीं ठावे म्हणे मी आहेव । भावावीण देव कैसा पावे ।।३।।
अनुतापेवीण भाव कैसा राहे । अनुभवें पाहें शोधूनियां ।।४।।
पाहतां पाहणें गेलें तें शोधूनी । एका जनार्दनीं अनुभविलें ।।५।।

परिमळ गेलिया वोस फुल देठीं । आयुष्या शेवटीं देह तैसा ।।१।।
घडीघडी काळ वाट याची पाहे । अजून किती आहे अवकाश ।।२।।
हाचि अनुताप घेऊन सावध । कांहीं तरी बोध करीं मना ।।३।।
एक तास उरला खट्वांग रायासी । भाग्यदशा कैसी प्राप्त झाली ।।४।।
सांपडला हरि तयाला साधनीं । एका जनार्दनीं हरि बोला ।।५।।

करा रे बापांनो साधन हरीचें । झणीं करणीचें करूं नका ।।१।।
जेणें बा न ये जन्म यमाची यातना । ऐशिया साधना करा कांहीं ।।२।।
साधनाचें सार मंत्रबीज हरी । आत्मतत्त्व धरी तोचि एक ।।३।।
कोटि कोटि यज्ञ नित्य ज्याचा नेम । एक हरि नाम जपतां घडे ।।४।।
एका जनार्दनीं न घ्यावा संशय । निश्चयेंसी होय हरिरूप ।।५।।

बारा सोळा जणी हरीसी नेणती । म्हणोनी फिरती रात्रंदिवस ।।१।।
सहस्र मुखांचा वर्णितां भागला । हर्ष जया झाला तेणें सुखें ।।२।।
वेद जाणूं गेला पुधें मौनावला । तें गुह्य तुजला प्राप्त कैंचें ।।३।।
पूर्व सुकृताचा पूर्ण अभ्यासाचा । दास सद्गुरूचा तोचि जाणे ।।४।।
जाणते नेणते हरीचे ठिकाणीं । एका जनार्दनीं हरि बोला ।।५।।

पिंडीं देहस्थिती ब्रह्मांडीं पसारा । हरिविण सार व्यर्थ भ्रम ।।१।।
शुकयाज्ञवल्क्य दत्त कपिलमुनी । हरिसी जाणोनि हरिच झाले ।।२।।
या रे या रे धरूं हरिनाम तारूं । भवाचा सागरू भय नाहीं ।।३।।
साधुसंत गेले आनंदीं राहिले । हरिनामें झाले कृतकृत्य ।।४।।
एका जनार्दनीं मांडिलें दुकान । देतो मोलावीण सर्व वस्तु ।।५।।

आवडीनें भावें हरिनाम घेसी । तुझी चिंता त्यासी सर्व आहे ।।१।।
नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा । पति तो लक्ष्मीचा जाणतसे ।।२।।
सकळ जीवांचा करितो सांभाळ । तुज मोकलील ऐसें नाहीं ।।३।।
जैसी स्थिति आहे तैशापरी राहें । कौतुक तूं पाहें संचिताचें ।।४।।
एका जनार्दनीं भोग प्रारब्धाचा । हरिकृपें त्याचा नाश झाला ।।५।।

दुर्बळाची कन्या समर्थाने केली । अवदसा निमाली दरिद्राची ।।१।।
हरिकृपा होतां भक्तां निघती दोंदें । नाचती स्वानंदें हरिंरगीं ।।२।।
देव भक्त दोन्ही एकरूप झाले । मुळींच संचलें जैसें तैसें ।।३।।
पाजळली ज्योती कापुराची वाती । ओवाळितां आरती भेद नुरे।।४।।
एका जनार्दनीं कल्पेंची मुराला । तोचि झाला ब्रह्मरूप ।।५।।

मुद्रा ती पांचवी लावूनियां लक्ष । तो आत्मा प्रत्यक्ष हरि दिसे।।१।।
कानीं जें पेरिलें डोळां तें उगवलें । व्यापकें भारले तोचि हरि ।।२।।
कर्म-उपासना-ज्ञानमार्गी झाले । हरिपाठीं आले सर्व मार्ग।।३।।
नित्य प्रेमभावें हरिपाठ गाय । हरिकृपा होय तयावरी।।४।।
झाला हरिपाठ बोलणें येथूनी । एका जनार्दनीं हरि बोला।।५।।

।। पुंडलीक वरदा हरि विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम।।

# विनवणीचे अभंग

१. संतभार पंढरीत । कीर्तनाचा गजर होत।।१।।
तेथ असे देव उभा । जैसी समचरणांची शोभा ।।२।।
रंग भरे कीर्तनात । प्रेमे हरिदास नाचत ।।३।।
सखा विरळा ज्ञानेश्वर । नामयाचा जा जिव्हार ।।४।।
ऐशा संता शरण जावे । जनी म्हणे त्याला ध्यावे ।।५।।

२. कृपाळु सज्जन तुम्ही संतजन। हेचिं कृपादान तुमचे मज।।१।।
आठवण तुम्ही द्यावी पांडूरंगा। कीव माझी सांगा काकुळती।।२।।
अनाथ अपराधी पतित आगळा। परि पायां वेगळा नका करु।।३।।
तुका म्हणे तुम्ही निरविल्यावरी। मग मज हरि उपेक्षीना।।४।।

३.संताचिये पायी हा माझा विश्वास । सर्वभावे दास झालो त्यांचा ।।१।।
तेचि माझे हित करिती सकळ । जेणें हा गोपाळ कृपा करी ।।२।।
भागलिया मज वाहातील कडे । त्यांचियानें जोडे सर्वसुख ।।३।।
तुका म्हणे शेष घेईल आवडी । वचन न मोडी बोलिले ते ।।४।।

४.आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा । माझिया सकळा हरीच्या दासा ।१।।
कल्पनेची बाधा न हो कवणें काळीं । ही संतमंडळी सुखीं असो ।।२।।
अहंकाराचा वारा न लागो राजसा । माझिया विष्णुदासा भाविकांसी ।।३।।
नाम म्हणे तया असावें कल्याण । ज्या मुखीं निधान पांडुरंग ।।४।।

५.तुमचिये दासीचा दास करुनि ठेवा । आशिर्वाद द्यावा हाचि मज ।।१।।
नवविधा काय बोलिली जे भक्ति । द्यावी माझ्या हातीं संतजनीं ।।२।।
तुका म्हणे तुमच्या पायांच्या आधारें । उतरेन खरे भवनदी ।।३।।

६. ठाकलोसे द्वारी । उभा याचक भिकारी ।। १ ।।
मज भीक काही देवा । प्रेम भातुके पाठवा ।। २ ।।
याचकाचा भार । घेऊं नये येरझार ।। ३ ।।
तुका म्हणे दान । सेवा घेतल्यावाचून ।। ४ ।।

७.हेचि जतन करा दान। धरुनि चरण राहिलो तें।।१।।
घ्यावी माझ्या हाते सेवा। हेचि देवा विनवणी।।२।।
आणिक कांही घाली भार। बहुत फार सांकडे।।३।।
तुका तुमचा म्हणवी दास। त्याची आस पुरवावी।।४।।

८.हेची व्हावी माझी आस। जन्मोजन्मी तुझा दास।।१।।
पंढरीचा वारकरी ।वारी चुको नेदी हरी।।२।।
संत संग सर्वकाळ। अखंड प्रेमाचा कल्लोळ।।३।।
चंद्रभागे स्नान। तुका मागे हेचि दान ।।४।।

९.शेवटची विनवणी । संतजनी परिसावी ।।१।।
विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हासी ।।धृ।।
पुढे फार बोलो काई । अवघे पायी विदित ।।२।।
तुका म्हणे पडिलो पाया । करा छाया कृपेची ।।३।।

१०.द्वारपाळ विनंती करी । उभे द्वारीं राउळा ।।१।।
आपुलिया शरणागता । वाहों चिंता नेदावी ।।धृ.।।
वचना या चित्ति द्यावें । असो ठावें पायांसी ।।२।।
तुका म्हणे कृपासिंधू । दीनबंधू केशवा ।।३।।

११.द्वारपाळ विनंती करी । उबे द्वारी राऊळा।।१।।
आपुलिया शरणागता। वाहों चिंता न द्यावी।।२।।
वचना या चित्त द्यावे। असो ठावे तुम्हासी।।३।।
तुका म्हणे कृपासिंधु। दीनबंधु केशवा।।४।।

१२.बोलिले लेकुरे वेडी वाकुडी उत्तरे ।।१।।
करा क्षमा अपराध महाराज तुम्ही सिद्ध ।।२।।
नाही विचारिला अधिकार म्यां आपुला।।३।।
तुका म्हणे ज्ञानेश्वरा राखा पायांपे किंकरा ।।४।।

१३.आता घेई माझे । भार सकळही ओझे ।।१।।
काय करिसी होय वाड । आलो पोटासी दगड ।।२।।
तूंचि डोळे वाती । होईं दीपक सांगाती ।।३।।
तुका म्हणे कांही । विचाराया चाड नाही ।।४।।

१४.पाहे पा ध्वजेचे चिरगुट ।राया जतन करीता कष्ट ।।१।।
तैसा मी एक पतित । परी तुझा मुद्रांकित ।।२।।
मसी पत्र ते केवढे ।रावो चालवी आपुल्या पाडे।।३।।
बापरखुमादेविवरदा ।सांभाळावे आपुल्या ब्रीदा ।।४।।

# उपसंहार व आरत्या

१) हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।।
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।।२।।
न लगे मुक्ति आणि संपदा ।संतसंग देई सदा ।।३।।
तुका ह्मणे गर्भवासी । सुखें घालावें आह्मांसी ।।४।।

२) बोलिलो ते आता। काही जाणता नेणता।।१।।
क्षमा करावे अन्याय। पांडुरंगे माझी माय।।२।।
स्तुती निंदा केली। लागे पाहिजे साहिली।।३।।
तुका म्हणे लाड। दिला तैसे पुरवा कोडा।।४।।

३) झाले  समाधान, तुमचे देखिले चरण ।।१।।
आता उठावेसे  मना, येत नाही नारायणा ।।२।।
सूरवाडीकपणे, येथे सापडले केणे ।।३।।
तुका म्हणे भोग, गेला निवारला लाग ।।४।।

४) करूनि आरती । आता ओवाळू श्रीपती ।।१।।
आजि पुरले नवस । धन्य जाला हा दिवस ।।धृ।।
पाहा वो सकळा । पुण्यवंता तुम्ही बाळा ।।२।।
आजि पुरले नवस । धन्य जाला हा दिवस ।।धृ।।
तुका वाहे टाळी । होता सन्निध जवळी ।।३।।
तुका वाहे टाळी । होता सन्निध जवळी ।।३।।
आजि पुरले नवस । धन्य जाला हा दिवस ।।धृ।।

५) प्रेम सप्रेम आरती । गोविंदाते ओवाळीती ।।१।।
धन्य धन्य ते लोचन । नित्य करिती अवलोकन ।।२।।
बाळा प्रौढा आणि मुग्धा । ओवाळीती परमानंदा ।।३।।
नामा म्हणे केशवाते । देखोनि राहिलो तटस्थे ।।४।।

# || आरती श्री विठ्ठलाची ||



युगे अठ्ठावीस विटेवरी उभा वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ।।१।।
जय देव जय देव जय पांडुरंगा ।
रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावें जिवलगा ।
जय देव जय देव जय पांडुरंगा ।।धृ।।
तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटी ।
कांसे पीतांबर कस्तुरी लल्लाटी ।।
देव सुरवर नित्य येती भेटी गरूड हनुमंत पुढें उभे राहती ।। जय देव ।।२।।
धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ।
सुवर्णाची कमळें वनमाळा गळां ।।
राई रखुमाबाई राणीया सकळा ।
ओंवाळिती राजा विठोबा सावळा ।। जय देव ।।३।।
ओंवाळूं आरत्या कुर्वंड्या येती । चंद्रभागेमध्ये सोडुनियां देती ।
दिंड्या पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा किती ।।जय देव ।।४।।
आषाढी कार्तिकी भक्तजन येती चंद्रभागेमध्ये स्नान जें करिती
दर्शनहेळामात्रें तया होय मुक्ती ।
केशवासी नामदेव भावे ओंवाळिती ।।जय देव ।।५।।

# ||आरती ज्ञानेश्वराची ||



आरती ज्ञानराजा महाकैवल्यतेजा
सेविती साधुसंतमनु वेधला माझा || आरती ||धृ.||
लोपले ज्ञान जगी हित नेणती कोणी
अवतार पांडुरंग नाम ठेविले ज्ञानी || आरती ||१||
कनकाचे ताट करी उभ्या गोपिका नारी
नारद तुंबरही साम गायन करी || आरती ||२||
प्रगट गुह्य बोले ।
विश्व ब्रह्मचि केले रामा जनार्दनी ।
पायी मस्तक ठेविले || आरती ||३||

# ।। आरती तुकाराम ।।



आरती तुकाराम ।। स्वामी सद्गुरुधामा ।।
सच्चिदानंदमूर्ती ।। पाय दाखवीं आम्हां ।।धृ०।।
राघवें सागरांत ।। पाषाण तारीले ।।
तैसे हे तुकाबाचे ।।
अभंग उदकीं रक्षिले ।। आरती० ।।१।।
तुकीतां तुलनेसी ।। ब्रह्म तुकासी आलें ।।
म्हणोनी रामेश्वरें ।। चरणीं मस्तक ठेविलें ।।
आरती० ।।२।।

# बाबांची आरती

# उपसंहार

घालीन लोटांगण, वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहीन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगिन आनंदे पूजीन ।
भावें ओंवाळीन म्हणे नामा ।।१ ।।
त्वमेव माताच पिता त्वमेव, त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव त्वमेव सर्वं मम देव देव ।।२ ।।
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा,
बुद्ध्यात्मना वा प्रकृतीस्वभावात् करोमि यद्यत,
सकलं परस्मै, नारायणायति समर्पयामि ।।३ ।।
अच्युतं केशवं रामनारायणं, कृष्णादामोदारं
वासुदेवं हरिं ।। श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं,
जानकीनायकं रामचंद्रं भजे ।।४ ।।
हरेराम हरे राम, राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।।५।।

# ।। सामुदायिक प्रार्थना ।।

श्री अनंता मधुसूदना। पद्मनाभा नारायणा।
जगव्यापका जनार्दना। आनंदघना अविनाशा।।१।।
सकळदेवाधिदेवा। कृपाळुवा जी केशवा।
महानंदा महाअनुभवा। सदाशिवा सहजरुपा।।२।।
विश्वंभरा। गरुडध्वजा करुणाकरा। सहस्त्रपादा।
सहस्त्रकरा। क्षीरसागरा शेषशयना।।३।।
कमलनयना कमलापती। कामिनी मोहना मदनमुर्ती।
भवतारका धरि त्या क्षिती। वामन मुर्ती त्रिविक्रमा।।४।।
अगा ये सगुणा निर्गुणा। जगज्जनित्या जगज्जीवना।
वसुदेव देवकीनंदना। बाळरांगणा बाळकृष्णा।।५।।
तुका आला लोटांगणी। मज ठाव द्यावा जी चरणी।
हेचि करीतसे विनवणी। भवबंधनी सोडवावे।।६।।

# ।। पसायदान ।।

आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनिं मज द्यावे । पसायदान हें ।।
जें खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी- रती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जिवाचें ।।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात ।।
वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।।
चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गाव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।
किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकी ।
भजिजो आदिपुरुखी । अखंडित ।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।
येथ ह्मणे श्री विश्वेशराओ । हा होईल दान पसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ।।